रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ❙ वर्ष ८९ ❙ अंक ४८ ❙ पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## बनावट दूतावासाचा पर्दाफाश

**गाझियाबाद :** उत्तर प्रदेशातील गाझियाबादमध्ये एका बनावट दूतावासाचा पर्दाफाश झाला आहे. मंगळवारी (दि.२२) एसटीएफने त्या ठिकाणी छापा टाकून हर्षवर्धन जैनला अटक केली. त्याच्याकडून व्हीआयपी क्रमांक असलेल्या ४ आलिशान कार जप्त करण्यात आल्या आहेत. यासोबतच विविध देशांचे आणि कंपन्यांचे ३४ सील देखील सापडले आहेत. याशिवाय परराष्ट्र मंत्रालयाचा सील असलेले बनावट कागदपत्रे आणि ४४.७० लाख रुपये रोख रक्कम देखील जप्त करण्यात आली आहे.


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २४ जुलै २०२५

किंमत ४ ₹


## बहिणींचा हफ्ता बंद होणार?

मुंबई: लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांची छाननी करुन ही संख्या कमी करण्याचा निर्णय सरकारनं घेतला होता. पण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही संपूर्ण प्रक्रिया थांबवल्याची माहिती आहे. खर्च कमी करण्यासाठी लाभार्थ्यांची संख्या कमी करण्यासाठी सरकारनं अर्जांची छाननी सुरु केली. अपात्र महिलांना योजनेतून वगळण्याची घोषणादेखील सरकारकडून करण्यात आली. अपात्र महिलांना योजनेतून वगळण्यासाठी प्राप्तिकर भरणाऱ्या महिलांच्या कुटुंबाचा तपशील केंद्रीय अर्थ खात्याकडून राज्य सरकारने मागवला आहे.






## वे|ध|क

### 'तेरणा'मधील कर्मचाऱ्यांकडून अपहार

**नेरुळ :** नेरुळ सेक्टर- २२ येथील तेरणा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना रिफंड देण्यात येणाऱ्या ३२ लाख रुपयांवर तीन कर्मचाऱ्यांनी डल्ला मारला. बिलिंग विभागात काम करणाऱ्या रोहन ठाकूर, प्रणय पाटील आणि बाळासाहेब सैंदाणे यांना पोलिसांनी अटक केली आहे. त्यांनी गुन्हा कबूल केला आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे. जुलै २०२४ मध्ये रुग्णांना देय असलेली रिफंड रक्कम सिस्टीममध्ये पूर्ण झाल्याची नोंद होती. पण ती रक्कम संबंधित रुग्णाला मिळाली नसल्याची तक्रार बिलिंग विभागाचे प्रमुख समीर कोळी यांना मिळाली होती. फायनान्स विभागाने केलेल्या ऑडिटनंतर हे प्रकरण समोर आले. या प्रकरणात तीन कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. रोहन ठाकूर (३५), प्रणय पाटील (३५) आणि बाळासाहेब सैंदाणे (३४) अशी त्यांची नावे आहेत. हे कर्मचारी नेरुळ सेक्टर-२२ येथील तेरणा हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या बिलींग विभागात काम करीत होते.

### कृषीमंत्री कोकाटेंची गच्छंती अटळ?

मुंबई : कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांबद्दलचे वादग्रस्त विधान आणि विधानसभेत रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी फटकारल्यानंतर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. तसेच कोकाटे यांच्याबद्दल पुढील भूमिका आमचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार मांडतील, असं तटकरे यांनी म्हटलं आहे. अजितदादा कोकाटेंबाबत भूमिका मांडतील, असं तटकरे यांनी स्पष्ट केलं आहे. जबाबदार नेतृत्वाने जे राज्याच्या मंत्रिमंडळात असतील किंवा लोकसभेत, राज्यसभेत असतील त्यांनी बोलताना तारतम्य ठेवलं पाहिजे, असे सांगत तटकरेंनी माणिकराव कोकाटे यांच्यावरील संभाव्य कारवाईचे संकेत दिल्याचंही बोललं जात आहे. त्यामुळे कोकाटे यांची गच्छंती अटळ असल्याची चर्चा सर्वत्र सुरु आहे. सभागृहामध्ये मोबाईलवर रमी खेळण्याच्या आरोपावर कोकाटेंनी केलेली सारवासारव आमदार रोहित पवार त्यांच्या अंगलट आणली आहे.

## कोकणात अतिमुसळधार पावसाचा अंदाज

**1 अति मुसळधार**

रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, सातारा घाट परिसर, कोल्हापूर घाट परिसर

**2 मुसळधार**

मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक घाट परिसर

**3 विजा तसेच मेघगर्जनेसह पाऊस**

धुळे, नंदुरबार, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, यवतमाळ

# 24 तास धोक्याचे



(छायाचित्र : समीर मालोदे)

**। अलिबाग । प्रतिनिधी ।** राज्यात मागील दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असताना, कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात बुधवारी अतिमुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर उर्वरीत भागात मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.संपूर्ण राज्यात गेल्या आठवड्यात पावसाने उघडिप दिली होती. परंतु मागील दोन दिवसांपासून पाऊस पुन्हा सक्रिय झाला आहे. मुंबई शहर तसेच उपनगरातही सोमवारपासून पाऊस पडत आहे. पावसाला पोषक वातावरण निर्माण झाल्यामुळे तसेच बंगालच्या उपसागरावर तयार झालेल्या वाऱ्यांच्या चक्राकार स्थितीमुळे परिसरात कमी दाबाचा पट्टा तयार होत आहे. त्यामुळे पुढील चार ते पाच दिवस कोकण किनारपट्टीसह विदर्भात पावसाचा जोर कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. याचबरोबर मराठवाड्यातील काही भागात मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

राज्यात सोमवारी सकाळी ८:३० ते मंगळवारी सकाळी ८:३० पर्यंत राज्यातील अनेक भागात मुसळधार पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये प्रामुख्याने मुरुड येथे १०८ मिमी, म्हसळा ८० मिमी, सोनपेठ १७५ मिमी, कुडाळ १०४ मिमी, सावंतवाडी ९८ मिमी, राजापूर ६६ मिमी, गुहागर ७४ मिमी पावसाची नोंद झाली. मराठवाड्यातही गेल्या २४ तासांत मुसळधार पावसाची नोंद झाली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये जुलै •> पान २ वर

### रायगडमध्ये दोन दिवस रेड अलर्ट

जूलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने जोरदार बरण्यास सुरुवात केली आहे. रायगडमध्ये दोन दिवस रेड अलर्टचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी सतर्क राहवे असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

### कुंडलिकेने ओलांडली इशारा पातळी

रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने पुन्हा जोर धरला आहे. रात्रीपासून पडलेल्या पावसाने धरणे नदी पाण्याने तुडूंब भरून गेल्या आहेत. जिल्ह्यामध्ये एकूण ७४७.६ मिमी व सरासरी ४६.७३ मिमी इतका एका दिवसात पाऊस पडल्याची नोंद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील सावित्री, अंबा, कुंडलिका, पाताळगंगा, उल्हास व गाढी नदीमध्ये मोठ्या प्रमाणात जलसाठा निर्माण झाला आहे. या पावसात कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. त्यामुळे नदीकिनारी असणाऱ्या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## वाळू तस्करांवर थेट 'एफआयआर'

### महसूल विभागाचे नवे परिपत्रक, अधिकाऱ्यांवर राहणार जबाबदारी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वाळू व इतर गौण खनिजांचा अनधिकृत उपसा, वापर व वाहतूक रोखण्यासाठी अशा व्यक्तींवर जबर कारवाई केली जाणार आहे. तस्करीमध्ये आढळून आलेल्या व्यक्तींवर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार केवळ दंडात्मक कारवाई न करता संबंधितांविरुद्ध फौजदारी कारवाई म्हणजेच एफआयआर दाखल करण्याची कार्यवाही महसूल विभागाच्या संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांनीच करावी, अशा सूचना महसूल मंत्रालयाने दिल्या आहेत.

अशा व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करताना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (उदा. कलम ४८ (७) व ४८ (८)), भारतीय न्याय संहिता (बीएसएस), २०२३ (उदा. कलम ३०३(२), ३१०(२), १३२, ३५१(२), ११८(१), ११५(२), ३३२(सी), ३(५)), पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९६६ (उदा. कलम ९ व १५), खाण आणि खनिज अधिनियम, १९५८ (उदा कलम ३.४ व २१), (सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम यामधील विविध कलम च्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही पोलीस अधिकारी, महसुल •> पान २ वर

**कुचराई केल्यास यंत्रणेवरही गुन्हे**

**गौण खनिजांचे अवैध उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करी करणाऱ्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यास अथवा दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपासात पोलीस, महसूल यंत्रणेमधील तसेच संबंधित सक्षम यंत्रणेच्या अधिकारी, कर्मचारी यांनी हयगय, कसूर केल्याचे निर्दशनास आल्यास संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांविरुद्ध संबंधित जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांनी कारवाई करावी, अशा सूचना महसूल मंत्रालयाने केल्या आहेत.**

## मुरूडच्या रुग्णालयाला प्लास्टीकचा आधार

### इमारतीमध्ये पावसाळ्यात पाणीगळतीचा त्रास

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

शंभर वर्षे जुने असलेल्या मुरूडमधील ग्रामीण रुग्णालयाच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग उदासीन ठरले आहे. त्यामुळे पावसाळ्यात पाणी गळतीच्या समस्येला सामोरे जाण्याची वेळ कर्मचाऱ्यांसह रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांवर आली आहे. या रुग्णालयाला प्लास्टीक आधार देण्यात आला आहे. पावसाळ्यात ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवा ठप्प होत आहे. रुग्णांना चांगली सेवा मिळावी, यासाठी आरोग्य व्यवस्था सुधारण्याची मागणी शेतकरी कामगार पक्ष मुरूड तालुका •> पान २ वर



> ज्या लोकप्रतिनिधींना जनतेने निवडून दिले, त्या लोकप्रतिनिधींनी दूरुस्तीकडे लक्ष दिले नाही. वारंवार दुरुस्ती काढून ठेकेदाराने पैसे काढण्याचे काम केले आहे. शवविच्छेदन गृहाच्या मागील एक उघडी टाकी आहे. त्यावर आवरणदेखील बसविण्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची उदासीनता आहे. औषधांची कमतरता आहे. पाण्याची गळती रुग्णालयात आहे. त्याचा नाहक त्रास होत आहे. स्वच्छता, फवारणी नगरपरिषद प्रशासन करीत नाही, अशा समस्या आहेत.
> – मनीष माळी, उपाध्यक्ष, शेकाप पुरोगामी युवक संघटना, मुरुड

## पाली-खोपोली महामार्गावर अपघात



**। पाली । प्रतिनिधी ।**

पाली-खोपोली राज्य महामार्गावर बुधवारी (दि.२३) तिवरे गावच्या हद्दीत दोन कार एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात एका कारमधील चालक गंभीररीत्या जखमी झाला असून दोन्हीही कारचे नुकसान झाले आहे.

पाली-खोपोली महामार्गावरून जात असताना तिवरेतील वळणावर होंडाची कार व मारुतीची कार या दोन कारचा एकमेकांना धडकून भीषण अपघात झाला. या अपघातात सिलेरिओ कारचा चालक गंभीररीत्या जखमी झाला असून कारमधील इतरांना •> पान २ वर

## एसटीला अपघात; प्रवासी जखमी

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड-दापोली राज्य मार्गावर मे महिन्यापासून चालू झाले-ली अपघातांची मालिका जुलै महिना संपत आला तरीदेखील चालू आहे. बुधवारी (दि.२३) दुपारी दोनच्या सुमारास मांडवकर कोंडजवळ पुणे फौजी-अंबवडे ही एसटी बस रस्त्यावरून घसरून झालेल्या अपघातात एसटी बसमधील चालक वाहकासहित आठ प्रवासी गंभीररित्या जखमी झाले. त्यांना महाडमधील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



पुणे फौजी अंबवडे (अहिरे कोंड) या बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांपैकी आठ प्रवाशांना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एसटी बसचालकाच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे तर महिला वाहक हिच्या हाताला मोठ्या प्रमाणावर गंभीर दुखापत झाली असून कमरेलादेखील मोठी दुखापत झाल्याने त्यांना शिरगाव ग्रामपंचायतचे सरपंच सोमनाथ ओझरडे यांनी आपल्या खासगी वाहनातून महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. यापैकी काही जखमींना महाशक्ती ॲम्ब्युलन्सने महाड ग्रामीण रुग्णालयात आणले.

यापूर्वी देखील एसटी महामंडळाच्या बसचा अपघात झाल्यानंतर मे महिन्यामध्ये •> पान २ वर

## बोरघाटात ट्रकची कारला धडक



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर बोरघाटात सायमाळजवळ ट्रकने समोरील कारला धडक दिल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात कारमधील एक महिला जागीच ठार झाली तर अन्य तीन जण गंभीर जखमी झाले.

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर बोरघाटातून ट्रक चालक मुबारक खोपोलीहुन लोणावळाकडे जात होता. बोरघाटात आला असता त्याची गाडी चढत नसल्याने त्याने ट्रक वळविला. तसेच परत खोपोलीकडे जात असताना तीव्र उतारावरील वळणावर आला असता चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटल्याने •> पान २ वर

## शाळाबाह्य, स्थलांतरित मुलांची शोधमोहीम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील ३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य तसेच स्थलांतरित मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण विभागाकडून शाळाबाह्य मुलांची विशेष शोध मोहीम १ जुलै ते १५ जुलै दरम्यान राबविण्यात आली.

या मोहीमेत १४३ शाळाबाह्य तसेच २०४ स्थलांतरित मुलांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात आले आहे. ही शोधमोहीम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहितुले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

**■ ३७४ मुले शिक्षणाच्या प्रवाहात**

**■ शिक्षण विभागाची यशस्वी कामगिरी**

जिल्ह्यात प्राथमिक समग्र शिक्षा कार्यक्रमाची तसेच प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत ज्ञानरचनावादी शाळा, कृतीयुक्त अध्ययन पद्धती, डिजीटल शाळा, आय. एस. ओ. मनांकन, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, मध्यान्ह भोजन, विविध शिष्यवृत्ती परिक्षा तयारी, नवोदय परिक्षा तयारी अशा प्रभावी उपक्रमांची अंमलबजावणी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांमार्फत शाळांमध्ये सुरू आहे. मात्र शासनाच्या अनेक योजना सुरू असतानाही अद्याप काही बालके शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास येत आहेत.

अशा बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणेसाठी शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन त्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता शाळाबाह्य तसेच स्थलांतरित मुलांची शोधमोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेत घरोघरी जाऊन शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करण्याव्यतिरिक्त बसस्थानक, रेल्वेस्थानक, बाजारपेठ, वीटभट्ट्या, दगडखाणी, साखर कारखाने, स्थलांतरित कुटुंबे, जिल्ह्यातील सर्व खेडी, गाव, वाडी, तांडे, पाडे, शेतमळे, जंगल, बालगृह, निरीक्षण गृह, विशेष दत्तक संस्था आदी ठिकाणी जाऊन शाळाबाह्य, स्थलांतरित विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला. या मोहिमेत ७७ मुले, ६६ मुली अशी एकूण १४३ शाळाबाह्य मुले सापडली असून, या सर्व मुलांना जवळच्या जिल्हा परिषद शाळेत प्रवेश देण्यात आला आहे. •> पान २ वर

**यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पुरस्कार वितरण | सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते सन्मान**

## मंदार वर्तक यांना राज्यस्तरीय बेस्ट सीईओ पुरस्कार प्रदान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असोसिएशनतर्फे राज्यातील बेस्ट सीईओ हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार रायगड जिल्हा सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक यांना प्रदान करण्यात आला. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथील कार्यक्रमात राज्याचे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते हा सोहळा संपन्न झाला.




यावेळी कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, महाराष्ट्र बँक असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. मंदार वर्तक यांनी हा पुरस्कार बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील आणि बँक्स असोसिएशनच्या संचालिका सुप्रिया पाटील यांच्या उपस्थितीत स्वीकारला.

मंदार वर्तक यांनी २०२२ साली रायगड जिल्हा सहकारी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर, अल्पावधीतच बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उल्लेखनीय वाटचाल केली. त्यांच्या कार्यकाळात सहकारी संस्थाचे देशातील पहिले संगणकीकरण, ६५०० कोटी रुपयांचा व्यवसाय तसेच आयएमपीएस, क्यूआर कोड सेवा, मोबाईल बँकिंग आणि इतर डीजिटल सेवा ग्रामीण ग्राहकांपर्यंत पोहोचवल्या. पारंपरिक बँकिंगकडून आधुनिक संगणक प्रणाली, प्रशासकीय पारदर्शकता आणि सेवा सुधारणांमुळे बँक राज्यातील आघाडीच्या जिल्हा बँकांमध्ये गणली जात आहे. •> पान २ वर

> सहकार चळवळीला महाराष्ट्रात महत्वपूर्ण ऐतिहासिक आणि गौरवशाली परंपरा आहे. आपली अर्थव्यवस्था ही सहकार चळवळीवर अवलंबून आहे.
> – पंकज भोयर, सहकार राज्यमंत्री

# मुंबई-गोवा महामार्गावरील उड्डाणपूल अपूर्ण

## ■ टोलवसुलीसाठी सुकेळी खिंडीत जोरात तयारी सुरू

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**मुंबई-गोवा महामार्गावरील अनेक उड्डाण पूल अपूर्णावस्थेत असतानाही मुंबई-गोवा महामार्गाच्या सर्वात विवादित कासू ते इंदापूर या ४२.३ किलोमीटर अंतराच्या टोलवसुलीसाठी सुकेळी खिंडीत गाठण्याची तयारी सध्या जोरात सुरू झाली आहे. खिंडीच्या पायथ्याशी भव्य टोलप्लाझा उभारला जात असून, या टोलप्लाझाचे काम अंतिम टप्प्यात आहे.**



टोल वसुलीसाठी आता केवळ अधिसूचना निघणे बाकी असून, जानेवारी महिन्यापासून या टप्प्यातील टोल वसुली करण्यास सुरुवात करावी लागेल, असे म्हणणे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे आहे. महामार्गाच्या या पहिल्या टप्प्यातील नागोठणे, कोलाड नाका येथील प्रमुख उड्डाण पुलांची कामे अद्याप ४० टक्के देखील पूर्ण झालेली नाहीत. त्याचबरोबर अनेक ठिकाणी अपूर्ण कामांमुळे एकेरी वाहतूक सुरू आहे. सध्या पडणाऱ्या पावसामुळे झालेल्या चिखलातून वाहने चालवावी लागत आहेत, अशाच कंबरतोड प्रवासानंतरही कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना टोल भरावा लागणार आहे. न्यायालयाच्या आदेशाने या टप्प्याचे काम या वर्षीच्या डिसेंबर अखेर पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे; परंतु सध्या सुरू असलेल्या कामाचा वेग पहाता, ही डेडलाईन पुन्हा हुकणार असल्याचे दिसून येत आहे. आतापर्यंत अनेक डेडलाईन हुकलेल्या या महामार्गाच्या टोलवसुलीची डेडलाईन चुकणार नाही, यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महामार्गाच्या कामापेक्षा या टोलप्लाझाच्या उभारणीचे काम अतिवेगात केवळ दोन महिन्यांत पूर्ण करण्यात आले. यावरून टोलवसुलीसाठी किती घाई चालली आहे, हे दिसून येत आहे. याला जिल्ह्यातील राजकीय लोकांनी विरोध करण्यास सुरुवात केली आहे. टोल वसुलीतून टोल नाक्यापासून १५ किलोमीटरच्या परिसरातील वाहन चालकांना सूट दिली जाणार आहे. यासाठी या वाहन चालकांना टोलनाक्यावर आपल्या वाहनांची नोंद करावी लागणार आहे. त्यानुसारच नाक्यावरुन त्या वाहनाला जाण्यास परवानगी दिली जाईल. त्यापेक्षा जास्त अंतरातील नागरिकांना टोल भरणे सक्तीचे असेल. यात अधिक पारदर्शकता यावी यासाठी जीपीएस प्रणालीचा वापर केला जाणार आहे. टोलवसुलीतील काही बारकाव्यांचा अभ्यास सध्या केला जात आहे. टोल वसुली झटपट व्हावी यासाठी फास्टटॅगचा वापर केला जाणार आहे. यासाठी तीन लेन तयार केल्या जात असून, रोखीने टोल भरणाऱ्यांसाठी एक लेन शिल्लक ठेवण्यात आली आहे. या लेनमधून जाणाऱ्या वाहनांना जर २० रुपये टोल फास्टटॅगने भरावा लागणार होता त्यासाठी साधारण ४० रुपये टोल रोखीने भरावा लागणार आहे. ही आकारणी फास्टटॅगपेक्षा दुप्पट आहे. यातून दुचाकी वाहनांना सूट असणार आहे.

### अधिसूचना येण्याची प्रतीक्षा

महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम डिसेंबर अखेरपर्यंत संपविण्याचे आदेश आहेत. हे काम कल्याण रोडव्हेज या कंत्राटदाराकडून वेळेत पूर्ण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. एकाच वेळी अनेक ठिकाणी कामे सुरू असून सध्याच्या पावसामुळे त्यात थोडा व्यत्यय आला. हे काम संपल्यानंतर लगेचच टोल वसुली करावी लागेल. टोलवसुली सुरू करण्यासाठी अधिसूचना येणे बाकी आहे, अशी माहिती राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे महाव्यवस्थापक (तांत्रिक व प्रकल्प संचालक) यशवंत घोटकर यांनी दिली.



# अक्कादेवी धरणावर एसएससीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयाच्या १९९९ च्या एसएससी बॅचच्या वतीने नुकताच अक्कादेवी येथील चिरनेर जंगल सत्याग्रहाच्या युद्धभूमीच्या ऐतिहासिक अक्कादेवी धरणावर स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

दिल दोस्ती आणि दुनियादारी अशी जबरदस्त मैत्री असलेला हा ग्रुप अनेक वर्षांनी एकत्र आल्याचे पाहायला मिळाले. टीमचे अध्यक्ष वैभव वर्तक आणि धनेश म्हात्रे यांनी पुढाकार घेत छान असे नियोजन करून सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. प्रारंभी केक कापून आनंद उत्सव साजरा केला. यावेळी टीमचे सहकारी समाधान म्हात्रे यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा एसएससी बॅचतर्फे सत्कार करण्यात आला. तचेस विज्ञान गावंड यांची मॅनेजिंग डायरेक्ट पदावर नियुक्ती झाल्याबद्दल त्यांनाही गौरविण्यात आले.

प्रशांत म्हात्रे यांना प्राप्त झालेल्या आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. पावसाच्या वातावरणात सवंगड्यांनी मनमुराद स्नेहसंमेलनाचा आनंद घेतला. सूत्रसंचालन जितेंद्र थळी यांनी तर आभार प्रशांत म्हात्रे यांनी मानले.

# एसटी थांब्यावर स्वयंचलित महिला सुविधा केंद्राचे लोकार्पण

**। कर्जत । वार्ताहर ।**

कर्जत रेल्वे स्थानका नजिकच्या एस टी थांब्या जवळ सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वूलू संस्था यांच्या संयुक्त सहभागाने स्वयंचलित महिला सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्राचा उदघाट सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सुविधा केंद्राचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.



आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते फीत कापून या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष राहुल डाळिंबकर, माजी पंचायत समिती सदस्य पुंडलिक भोईर, माजी नगरसेवक संकेत भासे, अभिषेक सुर्वे, संभाजी जगताप, शरद बडेकर, प्रमोद खडे, दिनेश कडू, वूलू संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिष केळशीकर, उपाध्यक्ष सरस्वती सिंग, वाणिज्य प्रमुख श्रेया कुंभवडेकर आदी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजीव वानखेडे व शाखा अभियंता अक्षय चौधरी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना आमदार महेंद्र थोरवे यांनी, या परिसरात कर्जत स्थानकातून येणाऱ्या महिला प्रवाशांची तसेच एसटीने प्रवास करणाऱ्या महिला प्रवाशांची खूप गैरसोय व्हायची म्हणून हे सुसज्ज असे महिला सुविधा केंद्र उभारण्यात आले आहे.

तसेच या केंद्राच्या बाजूला पुरुषांसाठी सुद्धा स्वच्छता गृह उभारण्यात येणार आहे. जेणे करून सर्वच प्रवाशांना सुविधा उपलब्ध होईल. त्याच बरोबर कर्जत व खालापूर तालुक्यात सुद्धा गर्दीच्या ठिकाणी अशा प्रकारची सुविधा केंद्र उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी लागणार आमदार निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असा शब्द दिला.

याप्रसंगी प्रदीप वायकर, किशोर कदम, वैभव सुरावकर, ज्ञानेश्वर कर्णूक, रोहित ओसवाल, नदीम खान, जनार्दन खंडागळे, भरत बामणे, दर्शन वायकर, विनोद दुलगज, संदीप कर्णूक, रोहित बाफना आदी उपस्थित होते.

**या स्वयंचलित महिला सुविधा केंद्र उभारणीसाठी पंधरा लाख रुपये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली होती. मात्र १२ लाख ४५ हजार रुपयांची तांत्रिक मान्यता प्रदान करून निविदा काढण्यात आली होती. यामध्ये महिलांसाठी वॉश रूम्स, वातानुकुलित स्वच्छतागृह, चेंजिंग रूम, बेबी डायपर स्टेशन, सॅनेटरी पॅड डिस्पेंसर, बेबी डायपर व्हेंडिंग मशीन, फ्रेशनर आदी सुविधा उपलब्ध आहेत.**



# लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी

**। कोलाड । वार्ताहर ।**

कोलाड गोवे येथील श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेतन व आय टी आय. येथे बुधवारी (दि.२३) लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्राचार्य विपुल मसाल यांच्या हस्ते रजिस्टार अजित तेलंगे यांच्या उपस्थितीत लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# चिकन-मटणाच्या दुकानासमोर रांगा

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पूर्वी तिखट जेवणाचा बेत फार वर्षातून मोजक्याच दिवशी व्हायचा. परंतु आता चिकन सेंटर, चायनीज सेंटर, धाबे, छोटे हॉटेल्स शहराप्रमाणे ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातही गल्लोगल्ली वाढल्यामुळे मांसाहारी लोकांना केव्हाही आपल्या आवडत्या जेवणाचा बेत आखता येतो.

त्यामुळे त्याचे महत्त्व कमी झाले असे म्हटले जाते. परंतु विशेष सण साजरे करताना चिकन, मटण सेंटरच्या दुकानात होणारी गर्दी पाहून तो गैरसमज दूर होतो.

काल गटारीच्या पार्श्वभूमी बुधवारी पहाटे पासूनच ग्राहकांच्या चिकन मटणाच्या दुकानांसमोर रांगा पाहायला मिळाल्या. विशेष म्हणजे मंगळवारी संध्याकाळपासूनच विक्रेते ग्राहकांच्या प्रतीक्षेत होते. मच्छी विक्रेत्यांकडेही ग्राहकांची गर्दी दिसून आली.

त्यामुळे मास मासळीचा भाव वधारला होता. तरी लोकांनी ज्यादा पैसे देऊन खरेदी केली. गटारीच्या निमित्ताने चिकन- मटण विक्रेत्यांची लाखो रुपयांची विक्री झाले असल्याचे बोलले जाते.



# जिंदल विद्यालयाने दिला मानवी मूल्यांवर भर

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याला प्रोत्साहन देण्यासाठी जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे समुपदेशन सत्राचे आयोजन करण्यात आले. प्रसिद्ध समुपदेशक श्रीमती प्राची देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे सत्र पार पडले. शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांच्या पुढाकाराने व दृष्टीकोनातून विद्यार्थ्यांच्या भावनिक सक्षमीकरणाची ही प्रेरणादायी पायरी ठरली. विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार सत्र दोन भागांत विभागण्यात आले होते. इयत्ता सहावी ते आठवीसाठी लिंग संवेदनशीलता हा विषय हाताळण्यात आला. प्राची देशमुख यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत, प्रत्येक व्यक्तीप्रती आदरभाव, समतेची जाणीव आणि सर्वसमावेशकतेचे मूल्य स्पष्ट केले. शाळेतील वातावरण समजूतदार आणि सुसंवादी व्हावे यावर भर देण्यात आला. इयत्ता नववी ते बारावीसाठी घेण्यात आलेल्या सत्रात तणाव व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. शैक्षणिक दडपण, परीक्षा काळातील चिंता, वेळेचे नियोजन आणि मानसिक स्थैर्य या सर्व मुद्द्यांवर उपयुक्त तंत्रे, श्वसन क्रिया आणि विचारशक्ती वाढवणाऱ्या सरावांचा परिचय देण्यात आला. या दोन्ही सत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांना त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक आयुष्यात उपयुक्त ठरणाऱ्या गोष्टींबाबत अंतर्मुख होण्याची संधी मिळाली. हा उपक्रम केवळ समुपदेशनापुरता मर्यादित राहिला नाही, तर मनाला भिडणारा अनुभव ठरला.



# समाजाच्या व्यासपीठातून चांगले कलाकार घडवा

## सुरेश पांढरकामे यांचे प्रतिपादन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांमध्ये जे कला गुण असतात त्यांना वाव देण्यासाठी तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी समाजाच्या व्यासपीठातून चांगले कलाकार घडवा. नक्कीच या व्यासपीठातून संगीतकार, डान्सर असे विविध कलाकार निर्माण होतील.आपल्या समाजाचे देशाचे नाव रोशन करतील असे प्रतिपादन सुरेश पांढरकामे यांनी संतश्रेष्ठ नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या समाधी सोहळाचे औचित्य साधून मुरुड शिंपी समाज हॉलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षीस समारंभावेळी बोलत होते.

यावेळी समाज अध्यक्ष विजय करंबे, युवक अध्यक्ष राणेंद्र कजबजे, महिला मंडळ अध्यक्ष शोभा राऊत, सिद्धेश करंबे, सोनाली बागडे, प्रज्ञा सादरे आदींसह समाजबांधव महिला वर्ग व उपस्थित होते.

यावेळी लहानमुलांचे अक्षर सुधारण्यासाठी लेखन स्पर्धा, संतपरंपरेचे ग्रंथ वाचन आशय स्पर्धा घेण्यात आल्या. महिलांनी महाराष्ट्रातील संत परंपरेने दिलेली संस्कृती दाखवणारे संगीत, वर्षांत येणारे मराठी सण, संत नामदेव महाराजांच्या करायचा आढावा घेणारे प्रसंग सादर केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सोनाली बागडे यांनी केले.

पान १ वरून

## २४ तास धोक्याचे

महिन्यात अतिवृष्टीमुळे पुरपरिस्थिती आणि दरड कोसळण्याच्या घटना वारंवार घडतात. दरवर्षी या कालावधीत मोठी वित्तहानीबरोबरच जिवीतहानी होते. यावर्षी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाने जोर धरला होता. मात्र तो फार काळ राहिला नाही. कधी ऊन कधी पाऊस अशी परिस्थिती या महिन्यामध्ये होती. भातलावणीची कामे सुरू असताना शेतांमध्ये पाणी नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले होते. लावणीची कामे लांबणीवर जाण्याची भिती निर्माण झाली होती. अखेर सोमवारपासून पावसाने पुन्हा सुरुवात केली आहे.

मंगळवारी रात्रीदेखील पाऊस सुरूच राहिला. बुधवारीदेखील पावसाची संततधार सुरूच होती. जिल्ह्यामध्ये तीन दिवस मुसळधार पाऊस पडणार आहे. गुरुवारी (दि. २४), शुक्रवारी (दि.२५)असे दोन दिवस रेड अलर्ट तसेच शनिवारी(दि. २६) ऑरेंज अलर्टचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. या कालावधीत पुरपरिस्थिती, दरड कोसळण्याच्या घटना घडण्याची भिती व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यात ३०० अपदा मित्र आहेत. ३९२ दरडग्रस्त आणि १३६ पुरग्रस्त भागांमध्ये या आपदा मित्रांची मदत घेतली जाणार आहे.

पुराच्या वेळी पाण्यात अडकलेल्या नागरिकांना काढण्यासाठी १४ रबरी बोटींची व्यवस्था केली आहे. ९१ अलर्ट सिस्टीम, वातावरणातील बदलत्या हवामानाची माहिती उपलब्ध होण्यासाठी ६० स्वयंचलित हवामान केंद्र, पर्जन्यमापक यंत्र ६०, सेटेलाईट फोन २० उपलब्ध करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## मुरूडच्या रुग्णालयाला प्लास्टीकचा आधार

पुरोगामी युवक संघटनाच्या वतीने करण्यात येत आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने मुरूड महत्वाचे ठिकाण ओळखले जाते. वर्षाला दोन लाखहून अधिक पर्यटक मुरुडला भेटी देतात. बाहेरील पर्यटकांसह स्थानिकदेखील मुरूडला फिरण्यास येतात. पर्यटकांसह स्थानिकांचे आरोग्य राखण्यासाठी मुरूडमध्ये ग्रामीण रुग्णालय आहे. या रुग्णालयाच इमारत शंभर वर्षे जूनी आहे. दूरुस्तीअभावी या इमारतीमध्ये पावसाळ्यात पाणी गळतीचा त्रास कायम आहे. त्याचा रुग्णांना नाहक त्रास होतो.

रुग्णालयाच्या दोन्ही प्रवेशद्वारासमोर कॅटल ट्रॅपसह ट्रेनेज दूरुस्ती बांधकाम करणे. फतिमा बेगम रुग्णालयातील लिक्वीड ऑक्सिजन प्लांटसाठी गेटसह शेड बांधकाम करणे, रुग्णालयाच्या दोन्ही आवारातील इमारतीमध्ये वाळवी प्रतिबंधात्मक उपचार करून पेस्ट कंट्रोल करणे, वैद्यकीय अधीक्षकांच्या निवासस्थान आवारात पेव्हर ब्लॉक बसविणे, लॅबसाठी वॉश बेसिनसह ओटा बांधणे, अपघात विभाग रॅम्प ठिकाणी शेड बनविणे, कार्यालयाच्या दोन्ही मोठ्या दरवाजाच्या ठिकाणी पत्र्याचे शेड बांधणे, विद्युत जनरेटर शेड बनविण्याबरोबरच त्या शेडला बंधिस्त करणे, वैद्यकीय अधीक्षक यांच्या कार्यालयाला सिलींग बसविणे, रुग्णालयाच्या इमारतीला प्लास्टरसह रंगरंगोटी करणे, डायलेसीस वार्ड बनविणे, साधन सामुग्री ठेवण्यासाठी मोठे स्टोअर रुम बनविणे, अधिपरिचारिका शासकीय वसाहत रुम अपुऱ्या असल्याने नवीन शासकीय वसाहत गृह बांधकाम करणे, नवीन शस्त्रक्रीया गृह बांधणे, पावसाळ्यात होणारी गैरसोय लक्षात घेता अंतर्गत भागातील सांडपाण्याचे नियोजन करणे आदी विविध मागण्या आजही प्रलंबित आहेत.

रुग्णालयाच्या मागील बाजूला पावसाचे पाणी जाण्याचे मार्ग पूर्णतः बंद झाला आहे. पावसाचे पाणी साठून रुग्णसेवा ठप्प होत आहे. रुग्णवाहिका शेड बसविण्याबरोबरच विद्यूत दूरुस्तीचे कामे करण्याची गरज निर्माण झाली आहे. मुरूडमधील ग्रामीण आरोग्य व्यवस्था खिळखिळी झाली आहे. संपूर्ण रुग्णालयाची इमारत ताडपत्रीने झाकूनदेखील पाण्याची गळती थांबत नाही. कर्मचाऱ्यांच्या वसाहतीची अवस्था दयनीय झाली आहे. पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे पाणी एकाच ठिकाणी साचून राहत आहे.

**बांधकाम विभागाचे दुर्लक्ष**

मुरूडमधील ग्रामीण रुग्णालयाच्या हाकेच्या अंतरावर सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय आहे. रुग्णालयातील या समस्यांबाबत वारंवार मागणी करूनदेखील त्यांच्याकडून बघ्याची भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे.

## एसटीला अपघात; प्रवासी जखमी

निकृष्ट दर्जाचे डांबर वापरून रस्त्यावर सिलकोट मारून डांबरीकरण करण्याचा उद्योग करणाऱ्या एफएमसी कंट्रक्शन कंपनीविरोधात अद्याप सार्वजनिक बांधकाम खाते का गुन्हा दाखल करीत नाही, असा प्रश्न या निमित्ताने पुन्हा एकदा निर्माण झाला आहे. या अपघातामुळे गणेशोत्सव काळात या मार्गावरून जाणाऱ्या वाहनांची संख्या लक्षणीय असल्याने ऐन गणेशोत्सवात या मार्गावर होणाऱ्या अपघाताला जबाबदार कोण, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.या बसमधील जखमी प्रवाशांमध्ये चालक अविनाश लोखंडे, वाहक पौर्णिमा होन कडसे, आशाबाई जाधव, शारदा शेलार, सोहम पवार, सिमाब पेडेकर, सलवा पेडेकर, आराधना पवार, लहू पाते, विश्वजीत कदम या जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले असून एसटी महामंडळामार्फत किरकोळ जखमींना अर्थसहाय्य देऊन त्यांना महाड ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

## बोरघाटात ट्रकची कारला धडक

त्याने समोरील येणाऱ्या इको कारला जोरदार धडक दिली. कार आणि ट्रक खड्ड्यात जाऊन पलटी झाल्याने भीषण अपघात झाला.

या अपघातात कारमधील एक महिला जागीच ठार झाली तर चालक बाबू चंद्रकांत जाधव, विद्या बाळू जाधव, बाबू चंद्रकांत जाधव, अवण्या बाबू जाधव (रा. सर्व घोडे भारूड, महाबळेश्वर) हे गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहिती मिळताच खोपोली पोलीस, बोरघाट पोलीस, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, आयआरबी टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली.

## मंदार वर्तक यांना राज्यस्तरीय बेस्ट सीईओ पुरस्कार प्रदान

विशेष म्हणजे बँकेने नाबार्ड, राज्य सहकारी बँक, आणि सहकार विभागाने ठरवलेल्या उद्दिष्टांपेक्षा अधिक उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. मंदार वर्तक यांच्या नेतृत्वाखाली बँकेने ६० पेक्षा अधिक शाखा व १७ एटीएमच्या माध्यमातून तळागाळातील गावकऱ्यापर्यंत आर्थिक सेवा पोहोचवल्या आहेत. त्यांनी सहकार, तंत्रज्ञान आणि सामाजिक बांधिलकी या त्रिसूत्रीवर आधारलेले बँकेचे धोरण प्रभावीपणे राबवले. त्यांच्या म्हणण्यानुसार, बँकेचे अध्यक्ष जयंत पाटील यांची दूरदृष्टी, उपाध्यक्ष सुरेश खैरे यांची खंबीर साथ तसेच संचालक मंडळाचे सुसंगत सहकार्य व बँकेचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप नाईक यांचे मार्गदर्शन हे या यशामागे मोठे योगदान आहे. तसेच बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे ग्राहकांच्या आणि हितचिंतकांच्या पाठिंब्यामुळे बँकेची प्रगती होत आहे असेही त्यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाय या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नामुळे बँक पुढील २ वर्षात १०,००० कोटींचा व्यवसाय टप्पा पूर्ण करेल असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला. या पुरस्कारामुळे रायगड जिल्हा सहकारी बँकेचा सन्मानच नव्हे, तर संपूर्ण राज्यातील सहकारी बँकांसाठी एक नवा आदर्श व प्रेरणास्त्रोत निर्माण झाला आहे. मंदार वर्तक यांचे नेतृत्व हे राज्यातील सहकार चळवळीला नवी दिशा देणारे ठरणार असल्याचा विश्वास संपूर्ण सहकार क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

## वाळू तस्करांवर थेट 'एफआयआर'

अधिकारी, कर्मचारी व संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी करावी, अशा सूचना केल्या आहेत.

वाळू व इतर गौण खनिजांचे अवैध उत्खनन वापर, वाहतूक व तस्करी यापासून परावृत्त करण्यासाठी, पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी आणि सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधी द्रव्ये विषयक गुन्हेगार, कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती, धोकादायक व्यक्ती, अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे व्यक्ती आणि वाळू तस्कर यांच्या विघातक कृत्यांना आळा बसावा यासाठी ग्रामीण क्षेत्रात संबंधित जिल्हाधिकारी व शहरी क्षेत्रात संबंधित पोलिस आयुक्त यांनी अशा व्यक्तींवर स्थानबद्धतेची कार्यवाही करावी, अशाही सूचना केल्या आहेत.

अशा विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१ मध्ये महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५/२०१६ अन्वये सुधारणा करण्यात आली असून, आता सदर अधिनियमात वाळू तस्कर या संज्ञेचा समावेश करण्यात आला असून त्यानुसारही कारवाई केली जाणार आहे.

## पाली-खोपोली महामार्गावर अपघात

किरकोळ दुखापत झाल्याचे समजते. दोन्ही वाहनांचे या अपघातात मोठे नुकसान झाले. मात्र कारमधील फुटलेल्या दारूच्या बाटल्या बघितल्यानंतर लक्षात येते की, कारमधील तरुण गटारी साजरी करण्यासाठी निघाले होते. जखमींना रुग्णवाहिकेतून दवाखान्यात नेण्यात आले आहे.

## शाळाबाह्य, स्थलांतरित मुलांची शोधमोहीम

तसेच इतर जिल्ह्यातून रायगड जिल्ह्यात स्थलांतरित होऊन आलेले १०५ मुले व ९९ मुली अशा २०४ मुलांनाही शाळेत दाखल करून घेण्यात असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाने दिली आहे.

# ऑनलाईन कार्यशाळा संपन्न

**। कोर्लई । वार्ताहर ।**

अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरुड महाविद्यालयात प्रभारी प्राचार्य डॉ.साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली इनक्युबेशन कमिटी आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'उद्योजकता, स्टार्टअप आणि इनक्युबेशन सेंटर' या विषयावर ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन केले होते.

या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील स्कूल ऑफ लाईफ सायन्सचे संचालक प्रा. भूषण चौधरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेत विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेविषयी जागृती निर्माण करताना शासकीय योजना, कौशल्यविकास, नवोपक्रमाची संस्कृती आणि नेटवर्किंगचे महत्त्व यावर सखोल चर्चा केली. त्यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप्सच्या संधींबाबत माहिती दिली आणि भविष्यातील करिअरमध्ये इनोव्हेटिव्ह विचार कसा महत्त्वाचा ठरतो. इनक्युबेशन कमिटी प्रमुख जावेद खान आणि आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे प्रमुख रहीम बागवान यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. या उपक्रमात विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्गाने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## निवडक



### रेल्वे स्थानकाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष

**महाड :** महाड तालुक्यातील सापे वामने रेल्वे स्थानक सद्या रेल्वे प्रशासनाच्या दुरवस्थेचे बळी पडले आहे. रेल्वे स्थानकावर गवताचे साम्राज्य पसरल्याने प्रवाशांना सर्प दशांची भीती निर्माण झाली आहे. याबाबत वारंवार रेल्वे प्रशासनाकडे तक्रारी करून देखील रेल्वे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचे सांगितले जात आहे. कोकण रेल्वे मार्गावर महाडपासून सुमारे ११ किमी अंतरावर असलेल्या सापे वामने गावाजवळ काही वर्षांपूर्वी रेल्वे स्थानक उभारले गेले आहे. या परिसरातील जवळपास २५ गावातील ग्रामस्थांनी याकरता आंदोलनात्मक भूमिका घेतली होती. या संघर्षानंतर या ठिकाणी रेल्वे स्थानक मंजूर करण्यात आले. कालांतराने सापे वामने या ठिकाणी रेल्वे क्रॉसिंग करिता या स्थानकाचे नूतनीकरण करण्यात आले. मात्र, नूतनीकरण केल्यापासून आजतागायत या ठिकाणी केवळ स्थानक म्हणूनच वापर होत आहे. रेल्वे स्थानक परिसरात गवताचे साम्राज्य असून अंधारात सर्प दंशांची शक्यता वाढली आहे. तसेच, एक ना अनेक संकटांनी स्थानक ग्रासले आहे. स्थानकाच्या देखभालीकडे रेल्वे प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष झाले आहे.




### पेन्शन अदालतीत ५२ अर्ज निकाली

**अलिबाग :** रायगड जिल्हा परिषदेच्या मार्फत नुकतेच पेन्शन अदालतचे आयोजन करण्यात आले होते. या पेन्शन अदालतीत ५२ अर्ज निकाली काढण्यात आले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे यांच्या उपस्थितीत पेन्शन अदालत पार पडली. पेन्शन अदालतमध्ये विविध विभागांचे एकूण १०४ सेवानिवृत्त कर्मचारी यांचे अर्ज प्रलंबित होते. या प्रकरणांचा आढावा सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे यांनी घेतला. या लोक अदालतमध्ये ४२ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. सर्व प्रलंबित अर्ज पुढील काही दिवसात निकाली काढण्याचे आश्वासन जिल्हा परिषद प्रशासनाने दिले आहेत. यावेळी जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम, ग्रामीण पाणी पुरवठा, अर्थ, आरोग्य, ग्रामपंचायत, पशुसंवर्धन विभागांमधील प्रतिनिधी उपस्थित होते.

### सोनू माफियावर कारवाई कधी?

**उरण :** उरणच्या द्रोणागिरी नोडपासून गावोगावी युवकांच्या आयुष्याशी खेळणारा सोनू माफिया आजही मोकाट फिरत आहे. नशीली पदार्थांची खुलेआम विक्री करून कोट्यवधींचा काळा धंदा करणाऱ्या या नराधमावर अजूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, ही उरणकर जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी शोकांतिका आहे. पनवेल रेल्वे स्थानकात निष्पाप बाळाच्या आडून ड्रग्जची तस्करी करणाऱ्या एका नायजेरियन महिलेस अमलीपदार्थ नियंत्रण विभाग बंगळुरूच्या विशेष पथकाने ३५ कोटींचा ड्रग्ज जप्त करून अटक केली. ही घटना जणू सोनूच्या 'बिझनेस मॉडेल'चा आरसा बनून समोर आली आहे. कारण अशा प्रकरणांमुळे उरणसह कोकणात नशेचे जाळे किती खोलवर रुजलंय, हे स्पष्ट होत आहे. सोनू नावाचा हा माफिया सुरुवातीला एका टपरीवरून पान विक्री करत होता. गुटख्याच्या विक्रीतून मिळालेल्या पैशातून त्याने नशेचा डाव मांडला आणि आता तो द्रोणागिरी नोडमध्ये 'बिग बॉस'सारखा राहत आहे. पान टपरीच्या आडून गांजा, चरस, गुटखा, ब्राऊन शुगर यांची विक्री करत त्याने लाखोंचा धंदा उभारला आहे. आधी गुन्हे दाखल, जेलची हवा, तरी धंदा सुरूच आहेत. स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, सोनूने नशीली व्यापारातून कोट्यवधींचे गाळे व सदनिका खरेदी केल्या आहेत. त्यामुळे या ड्रग्ज माफियाला संरक्षण कोणाचे? पोलीस, राजकीय नेते, की स्वतः यंत्रणाच गुंगीची शिकार झालीय? तसेच, सोनू माफियावर कारवाई कधी होणार, असा संतप्त सवाल उरणकरांमधून होत आहे.

### आठवडा बाजार चोरट्यांचा अड्डा

**उरण :** उरणमध्ये ठिकठिकाणी बेकायदेशीर आठवडा बाजार थाटून बसले आहेत. आणि तेही सरळसरळ हप्ते घेऊन. या बाजारांचे अस्तित्व कायद्याच्या बाहेर असूनही त्यांच्यावर कारवाईचे नाव नाही. याउलट, हे बाजार चोरट्यांसाठी 'सुरक्षित अड्डे' बनले असून पोलीस मात्र नुसते तमाशा बघत असल्याचा आरोप स्थानिकांमधून होत आहे. या अनधिकृत बाजारांमुळे उरणमध्ये गेल्या काही दिवसांत चोरीच्या घटना झपाट्याने वाढल्या आहेत. घरात कोणी नसताना चोरटे डल्ला मारून लाखोंचे दागिने लंपास करत आहेत. चोऱ्यांची पद्धत पाहता, ही घडामोड सामान्य नाही. ती व्यवस्थित रेकी करून, बाजारातूनच माहिती मिळवून केली जात असल्याचे बोलले जात आहे. तसेच, या बाजारांमुळे फक्त चोरीच नव्हे, तर वाहतूककोंडी, वाद, मारामाऱ्या हे रोजचेच झाले आहे. रस्त्यावर अडथळा, हॉर्नचा गोंगाट आणि पोलिसांचा मूग गिळलेला आळस हे चित्र उरणवासीयांना आता नवे राहिले नाही. पोलिसांना सर्व माहिती असूनही त्यांच्याकडून कोणतीही कारवाई होत नाही, हेच संशय अधिक गडद करते. उद्या एखाद्या नागरिकाच्या जीवावर उठणारी घटना घडली, तर त्याची जबाबदारी पोलीस घेणार की हप्ते घेणारे, असा संतप्त प्रश्न करत उरणकरांचा संताप उफाळून येत आहे.

### पनवेलमध्ये अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

पनवेल : पनवेलमध्ये एका अनोळखी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. त्या व्यक्तीचे अंदाजे नाव आझाद (४७) असून त्याची उंची ५ फूट ६ इंच, रंग सावळा, चेहरा-उभट असे वर्णन असून ही व्यक्ती तळोजा फाटा येथे भोवळ येऊन पडली होती. त्याला प्रथम उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर ठाण्यातील प्रादेशिक मनोरुग्णालय व तेथून सायन हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# पीक विमा नोंदणीकडे शेतकऱ्यांची पाठ

**। प्रमोद जाधव ।**
। अलिबाग ।

आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास त्या शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ देण्यासाठी प्रधानमंत्री पीकविमा योजना सुरु केली आहे. नोंदणी करण्यासाठी ॲग्रीकल्चरल इन्सुरन्स कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणात जाहिरातबाजी करण्यात आली आहे. ४० हजारहून अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी करणे अपेक्षीत आहे. मात्र, आतापर्यंत फक्त १ हजार ५६८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे या नोंदणीकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरविल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे. त्यामुळे पीक विमा कंपनी शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्यास अपयशी ठरली आहे.

पेरणी न होणे, पुर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफुटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरीता विमा संरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी रायगड जिल्ह्यात



- **फक्त दीडहजार जणांकडून नोंदणी**
- **शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यात कंपनी अपयशी**

ॲग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनीमार्फत पीक विमा योजना राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील भात पिकासाठी पीक विमा संरक्षित रक्कम ६१ हजार रुपये असून नाचणी विमा संरक्षित रक्कम ३५ हजार रुपये आहे. त्यासाठी ई-पीक पहाणी अंतर्गत पिकांची नोंदणी करावी लागणार आहे. या योजनेंतर्गत भातासाठी एक एकर क्षेत्राकरिता १८३ रुपये, एक हेक्टर क्षेत्रासाठी ४५७ रुपये हप्ता आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे नाचणी पिकाचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे एक एकर क्षेत्रासाठी ३५ रुपये व एक हेक्टर क्षेत्रासाठी ८७.५० रुपये हप्ता आहे. पीक विम्याची नोंदणी करण्यासाठी ॲग्रीकल्चरल इन्सुरन्स कंपनीमार्फत जनजागृती करण्यात आली आहे. शेतावर जाण्यापासून वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून पीक विमा नोंदणीचे आवाहन करण्यात आले. वेगवेगळे फलक तयार करण्यात आले आहे. मात्र, या कंपनीचा प्रयत्न अपयशी ठरल्याचे दिसून येत आहे.

प्रधानमंत्री पीक विमा या योजनेंतर्गत खरीप हंगाम २०२५ करीता शेतकरी नोंदणीसाठी दि.३१ जुलै अंतिम तारीख आहे. २२ जूलैपर्यंत १ हजार ५६८ शेतकऱ्यांनी पिक विमा नोंदणी केली आहे. त्यामुळे अपेक्षेपेक्षा फारच कमी नोंदणी झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे. पीक विमा नोंदणीसाठी मुदत संपण्यासाठी सातच दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे २ हजारपर्यंत तरी विम्याची नोंदणी होईल का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> **नोंदणीला अल्प प्रतिसाद**
> **मागील वर्षी एक रुपयावर पीक विमा नोंदणी करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले होते. या आवाहनाला शेतकऱ्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. खरिप हंगामात गतवर्षी ४० हजारहून अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. त्या अगोदर ६० हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली होती. नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, याकरीता खरीप हंगामासाठी यावर्षी कृषी विभागामार्फत प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरु करण्यात आली आहे. परंतु, यंदा पीक विमा नोंदणीला फारसा प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे.**



## उरणकरांची होतेय खड्ड्यावरील कसरत

**। उरण । प्रतिनिधी ।**

नादुरुस्त रस्ते आणि अपघात हे नेहमीचेच समीकरण बनले आहे. उखडलेल्या रस्त्यांमुळे नागरिकांचा नाहक बळी जातो. तरीही प्रशासन ढिम्म असते. आता तर पावसाळा सुरु झाला असून फुंडे डोंगरी व पाणजे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. पावसाचे पाणी खड्ड्यात साचून दिवसेंदिवस अपघातांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे या रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्त्याचे नूतनीकरण करावे, अशी मागणी अखिल आगरी समाज परिषदेच्या अध्यक्षा सीमा घरत यांनी केली आहे.

उरण तालुक्याचा औद्योगिक दृष्ट्या झपाट्याने विकास होत आहे. त्यामुळे या तालुक्यात दळणवळण यंत्रणेची झपाट्याने रेलचेल सुरू झाली आहे. प्रवाशी वाहतूक, मालाचीरेलचेलकरणाऱ्या वाहनांसाठी सिडको, जेएनपीए बंदर प्रशासन, महामार्ग, अथॉरिटी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून तालुक्यातील अनेक रस्त्याची कामे केली जात आहेत. मात्र, भ्रष्ट कारभारामुळे तालुक्यातील रस्त्यांची अल्पावधीतच दुरवस्था होत आहे.

यंदाच्या पावसाळ्यात तालुक्यातील अनेक रस्त्याची दुरवस्था झाली असून खड्डे युक्त रस्त्यातून मार्गक्रमण करणाऱ्या प्रवाशांना अपघातात आपले प्राण गमवावे लागले आहे.सध्या पावसाळ्यात फुंडे डोंगरी, पाणजे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर खड्डे पडले आहेत. तरी सिडको, जेएनपीए बंदर प्रशासनाने सदर रस्त्यावरील खड्डे बुजवून नव्याने रस्त्याचे काम हाती घ्यावे, अशी मागणी आगरी समाज परिषदेच्या अध्यक्षा सीमा घरत यांनी केली आहे.

## वन जमिनीसाठी आमरण उपोषण

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

मुबंईपासून अगदी काही अंतरावर असलेल्या खालापूर तालुक्यातील खडई धनगरवाडा आणि करंबेळी ठाकूरवाडीतील ग्रामस्थ आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत. येथील रस्त्याचा ३/२ प्रस्तावमंजुरीसाठी पाठवावा, अश्या प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. परंतु, मागील तीन वर्षांपासून परिपूर्ण प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे. खालापूर वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या आडमुठे धोरणामुळे तीन वर्ष उलटूनही वन हक्क कायदा २००६ चे कलम ३/२ नुसार या रस्त्यासाठी आवश्यक वन जमिनीच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे येथील

> **आज खालापूर तहसीलजवळ उपोषणाचे आयोजन**

ग्रामस्थांना स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही पायपीट करून हलाखीचे जीवन जगावे लागत आहे. त्यामुळे एकीकडे भारत देश महासत्ता होत असल्याच्या वल्गना होत असताना या दोन्ही वाड्यांतील आदिवासींच्या नशिबी आजही नरक यातना येत आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली खडई धनगरवाडा आणि करंबेळी ठाकूरवाडी येथील ग्रामस्थ खालापूर तहसील समोर गुरूवारी (दि.२४) आमरण उपोषणाला बसणार आहेत.

## नेरळमध्ये शासकीय नियमांची पायमल्ली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत - कल्याण राज्यमार्गाच्या कडेला हिल रॉक नावाचे रिसॉर्ट आहे. वाणिज्य वापर करणाऱ्या कोणत्याही बांधकाम ासाठी शासनाच्या नगररचना विभागाकडून बिनशेती जमीन असावी लागते. मात्र, अनेक बंगले आणि इमारती तसेच स्विमिंग पूल उभारणाऱ्या हिल रॉक रिसॉर्टची जमीन आजही बिनशेतीमध्ये रूपांतरित झालेली नाही. या बांधकाम विषयी ग्रामपंचायतमध्ये अनधिकृत बांधकाम अशी नोंद असून किरकोळ घरपट्टी संबंधित जमीन मालक भरत आहे. त्यामुळे अशा वाणिज्य वापर करणाऱ्या बांधकामांवर महसूल विभाग कारवाई करणार आहे की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**महसूल विभागाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष?**




कल्याण-कर्जत राज्यमार्ग रस्त्यावर नेरळमधील जिते गावच्या हद्दीत हिल रॉक रिसॉर्ट उभे आहे. या रिसॉर्टच्या उभारणीसाठी जमिनीचे बिनशेतीमध्ये रूपांतर होणे आवश्यक असते. त्यानंतर बांधकाम करून त्या इमारतींचा वापर वाणिज्य स्वरूपात करता येतो. त्यात हिल रॉक हे रिसॉर्ट उभ्या असलेल्या सर्व्हे नंबर ८२ मधील कोणतेही क्षेत्र हे बिनशेती म्हणून मान्यता दिलेले नाही. नगररचना विभागाकडे या भागातील शेतजमीन मालकांनी मागणी केली आहे. मात्र, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून या जमीन मालकांना ना हरकत परवाना मिळालेला नाही. त्याचा परिणाम रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडून बिनशेती दाखला देण्यात आलेले नाहीत. मात्र, तरीदेखील हिल रॉक सारखे रिसॉर्ट येथील पाच एकर जमिनीवर उभे राहिले आहे. जमीन बिनशेती केली नसताना तेथे विहिरी खोदण्यात आल्या असून या जमीन मालकावर कोणाचा वरदहस्त आहे, याची चर्चा सुरू आहे.

> **कर्जत-नेरळ रस्त्यावरील हिल रॉक रिसॉर्ट संबंधी तक्रारी आमच्या कार्यालयाकडे आल्या असून नेरळ मंडळ अधिकारी यांना चौकशीचे आदेश दिले आहेत.**
> **- डॉ. धनंजय जाधव तहसीलदार**

## बोगस डॉक्टरांची शोध मोहीम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडून पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील बोगस डॉक्टरांवर कारवाईस सुरुवात करण्यात येणार असल्याचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी सांगितले आहे. त्या

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील खारघर, तळोजा, कळंबोली, कामोठे व पनवेल येथील खासगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनेमार्फत खासगी वैद्यकीय व्यावसायिकांची माहिती व संबंधित कागदपत्रे आरोग्य विभागाकडे प्राप्त झाली आहेत. त्या अनुषंगाने बोगस डॉक्टर शोध मोहीम कारवाईला सुरुवात होणार आहे. यासाठी प्रभाग अधिकारी, मुख्य स्वच्छता निरीक्षक व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय




अधिकारी यांच्या पथकामार्फत खासगी वैद्यकीय व्यावसायीकांच्या मेडिकल कॉन्सिलची नोंदणीची कागदपत्रे, वैद्यकीय पदवी प्रमाणपत्र व बायोमेडीकल वेस्ट प्रमाणपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. महाराष्ट्रमेडिकलकॉन्सिल, मेडिकल कॉन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन, महाराष्ट्र कॉन्सिल ऑफ होमियोपॅथी व महाराष्ट्र डेंटल कॉन्सिल या वैद्यक परिषदेकडे नोंदणी नसलेल्या खासगी वैद्यकीय व्यावसायीकास बोगस डॉक्टर घोषित करण्यात येईल व त्या डॉक्टरावर नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांना ही मोहीम प्रभावीपणे राबवण्याकरिता सर्व खासगी व्यावसायिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

## प्रकल्पग्रस्तांचे गेट बंद आंदोलन

**। उरण । प्रतिनिधी ।**

खोपटे येथील पिकत्या जमिनी ऑल कार्गो कंपनीने कवडीमोल भावाने संपादित केली आहे. स्थानिक भूमिपुत्रांच्या जमिनी ऑल कार्गो कंपनीने संपादित केली असली तरी या कंपनीत नोकरीत व इतर गोष्टींमध्ये स्थानिक पुत्रांना प्राधान्य न देता इतर व्यक्तींना प्राधान्य दिले जात आहे. त्यामुळे संतप्त झालेल्या स्थानिक भूमिपुत्र असलेल्या बेरोजगार तरुणांनी एकत्र येत सोनखार बाधित प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना खोपटेच्या माध्यम ातून गुरूवारी (दि.२४) सकाळी ११ वाजता करण्यात आली आहे. स्थानिक प्रकल्पग्रस्त बेरोजगार तरुण खोपटे गावाजवळ असलेल्या ऑल कार्गो कंपनीच्या गेट समोर हे गेट बंद आंदोलन करण्यात येणार आहे.

## उरणच्या ग्रामपंचायतीत भ्रष्टाचार जोरात

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील अनेक ग्राम पंचायती सध्या थेट भ्रष्टाचाराची अड्डा बनल्या आहेत. कंपन्यांकडून कोट्यवधींचा कर मिळूनही गावात विकासकाम कुठेही दिसत नाही. परंतु, सत्ताधाऱ्यांच्या खिशात मात्र नोटांची चकचकीट भर पडत आहे. याच भ्रष्ट कारभारावर आता तक्रारींचा भडिमार सुरू झाल्याने घाबरून काही ग्रामसेवकांनी सरळ आपली बदली तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीत करून घेतली आहे. या भ्रष्टाचाराचे लचांड सामान्य कर्मचाऱ्यांवर टाकून वरिष्ठ अधिकारी आणि सत्ताधारी स्वतः ची सुटका करत आहेत. त्यामुळे इमानदार ग्रामसेवकांमध्ये तीव्र

- **चौकशी टाळायला ग्रामसेवकांची बदली**

नाराजी आहे. जागृत नागरिकांनी आता या भ्रष्ट कारभाराची फाईल माहितीच्या अधिकारात मागवून उघड पाडायला सुरुवात केली आहे. काहींनी तर थेट आयकर, ॲण्टी करप्शन, ईडी यांच्याकडे तक्रारी दिल्या आहेत. यामुळे सत्ताधारी आणि काही ग्रामसेवकांच्या उरात धडधड सुरू झाली आहे. चौकशीची धास्ती वाटू लागल्यानं काहींनी तातडीने रजेवर जाऊन दुसऱ्या ग्रामपंचायतीत आपली बदली करून घेतली आहे.

**आदिवासी समाज संघटनेचा पुढाकार | भाडेतत्त्वावर पहिली ते पाचवीपर्यंत वर्ग**

## कळंब शासकीय आश्रम शाळा पुन्हा सुरू

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका बहुल आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यात ठाकूर समाज, कातकरी, महादेव कोळी समाजाच्या जमातीचे लोक मोठ्या प्रमाणात रहात आहेत. तालुक्यात चार शासकीय आश्रम शाळा असून आदिवासी विद्यार्थी संख्या जास्त असल्याने शाळा अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे एकात्मिक आदिवासी विकास पेण प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे व आदिवासी समाज संघटनेच्या पुढाकाराने कळंब येथील काही वर्षापासून बंद पडलेली




शासकीय आश्रम शाळा पुन्हा सुरु करण्यात आली आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या कार्यक्षेत्रातील कळंब आश्रम शाळा पटसंख्या अभावी बंद करण्यात आली होती. बंद केलेल्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना पालकांच्या पसंतीनुसार व भौतिक सोयी सुविधा असलेल्या जवळच्या आश्रम शाळांमध्ये प्रवेश देण्यात आला होता. तसेच, या आश्रम शाळेमध्ये शिकत असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना अन्य ठिकाणी पाठवण्यात आले होते. आदिवासी जमातीची कातकरी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात असल्याने त्या ठिकाणी कळंब शासकीय आश्रम शाळा सुरू करण्याबाबत मागणी होत होती. त्यानुसार या ठिकाणी सन २०२५- २६ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय आश्रम शाळा सुरू करण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने या ठिकाणी शासकीय आश्रम शाळा सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींसह तालुक्यातील आदिवासी समाज संघटना यांच्याकडून वारंवार मागणी केली जात होती. तसेच, प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून देखील या ठिकाणी शाळेची आवश्यकता असल्याने कळवण्यात आलेले होते. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण अंतर्गत कर्जत तालुक्यातील कळंब या ठिकाणाची बंद करण्यात आलेली इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतची प्राथमिक शासकीय आश्रमशाळा सन २०२५- २६ शैक्षणिक वर्षापासून पुन्हा सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. कळंब येथील शासकीय आश्रम शाळा तात्पुरती स्वरूपात कशेळे येथील भाडेतत्त्वावर पहिली ते पाचवीपर्यंत वर्ग सुरू करण्यात आले आहेत.

> **कर्जत तालुका ग्रामीण भाग असल्याने येथील विद्यार्थी संख्या जास्त आहे. कळंब शाळेसाठी स्थानिक लोक प्रतिनिधी तसेच आदिवासी समाज संघटना यांनी वारंवार प्रकल्प पेण कार्यालयात पत्र व्यवहार करून त्यांची मागणी केली. प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून देखील या ठिकाणी शाळेची आवश्यकता असल्याने मान्यता देण्यात आली आहे.**
> **- आत्माराम धाबे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण**

# मोदींचा मुखवटा फाटला

नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांची सरकार आणि पक्ष यांच्यावर राक्षसी पकड आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये त्यांच्या गुप्त मसलतींपैकी एकही गोष्ट बाहेर फुटू शकलेली नाही. त्यांचा कारभार कशा हुकुमशाही रीतीने चालतो हे जनतेला कधीच कळत नाही. लोकशाही वगैरेंचा देखावा चालू राहतो. सोमवारी मात्र मोदींचा हा मुखवटा टराटरा फाटला. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी अचानक राजीनामा दिला. मोदींच्या दरबारात सर्व काही आलबेल नसल्याचे उघड झाले. राजीनाम्याच्या पत्रात धनखड यांनी प्रकृती ठीक नसल्याचे कारण दिले. मार्च महिन्यात त्यांना अचानक इस्पितळात दाखल करावे लागले होते. एक शस्त्रक्रियाही झाली होती. मात्र त्यानंतर त्यांची प्रकृती ठीक होती. ते देशभर फिरत होते. मध्यंतरी ते महाराष्ट्रातही येऊन गेले. विधिमंडळाच्या सदस्यांपुढे भाषण देऊन गेले. पंधरा दिवसांपूर्वीच दिल्लीतल्या एका कार्यक्रमात बोलताना आपण २०२७ मध्ये रीतसर निवृत्त होऊ असे ते म्हणाले होते. सध्या ७५ वर्षांच्या नेत्याने निवृत्त झाले पाहिजे याची वारंवार आठवण करून दिली जात आहे. मोहन भागवत व नरेंद्र मोदी सप्टेंबरात ७५ वर्षे पूर्ण करीत असल्याने ते निवृत्त होणार का याची जोरदार चर्चा चालू आहे. धनखड हेही लवकरच ७५ वर्षांचे होतील. या पार्श्वभूमीवर त्यांनी आपला २०२७ पूर्वी निवृत्तीचा इरादा नसल्याचे सांगितले होते. सोमवारी सुरू झालेल्या राज्यसभेच्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी अध्यक्ष म्हणून त्यांनी दिवसभर कामकाज पाहिले. त्यावेळी त्यांना आरोग्याचा कोणताही त्रास होत असल्याचे दिसले नाही. त्यामुळे रात्री अचानक त्यांनी केलेली ही घोषणा चक्रावून टाकणारी होती. नरेंद्र मोदींनीच त्यांना ताबडतोब राजीनामा द्यायला सांगितला असणार हे आता जवळपास स्पष्ट झाले आहे. किंबहुना, काही जणांच्या मते त्यांच्या राजीनाम्याचे पत्रही मोदींचे कार्यालय वा भाजपकडूनच तयार केले गेले. असे काही घडते आहे याची खबर एकाही टीव्ही वाहिनी वा वृत्तपत्रांना लागली नाही. अठ्ठेचाळीस तास उलटले तरीही राजकीय निरीक्षक, पत्रकार वा विरोधी नेते यांच्यापैकी एकालाही ठामपणे राजीनाम्यामागचे कारण सांगता आलेले नाही. म्हणजे मोदी–शाह यांची पकड कायम असली तरी या निमित्ताने त्यांच्या राक्षसी चेहऱ्याचे दर्शन लोकांना घडले आहे.

## कस्पटासमान वागणूक

एरवी, धनखड यांना तडकाफडकी घालवायचे आहे असे मोदींनी समजा ठरवले असते तरी त्यासाठी एक देखावा निर्माण केला गेला असता. कदाचित धनखड यांना रुग्णालयात दाखल व्हायला सांगितले गेले असते. तेथे काही काळ उपचारांचे नाटक झाले असते. मोदी व शाह यांनी नाटकीपणाने स्वतः तेथे जाऊन त्यांची विचारपूसदेखील केली असती. शेवटी रुग्णालयातूनच धनखड यांनी राजीनाम्याचे पत्र पाठवले असते. त्यामुळे त्या राजीनाम्यामागे मोदी आहेत हे कोणाला म्हणता आले नसते. पण सोमवारी ज्या तातडीने हे घडले त्यावरून दोनच गोष्टी संभवतात. एक म्हणजे धनखड यांना खरोखरच इतक्या ताबडतोब जायला सांगून मोदींनी सरकार व पक्षातल्या सर्वांना एक कडक इशारा दिला आहे. किंवा दुसरे म्हणजे, धनखड यांनी अनपेक्षितपणे राजीनामा देऊन मोदी व पक्षाची पंचाईत केली आहे. मोदींच्या दरबारात उपराष्ट्रपतींसारख्या संविधानिक पदावरील व्यक्तीला देखील किती कस्पटासमान वागवले जाते हे त्यांनी दाखवून दिले आहे. पण यातील पहिलीच शक्यता अधिक खरी वाटते. पायउतार व्हा हे मोदींकडूनच त्यांना सांगितले गेले व त्यांना दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिला नाही. वर म्हटल्याप्रमाणे याच्या कारणांबाबत सध्या नुसतेच तर्कवितर्क चालू आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा प्रकरणी हे झाले असे बऱ्याच जणांचे म्हणणे आहे. न्यायमूर्ती वर्मा यांच्या घरी कोट्यवधी रुपयांची रोकड सापडली होती. त्या प्रकरणी त्यांना काढून टाकण्यासाठी त्यांच्याविरुध्द महाभियोग चालवावा असा प्रस्ताव संसदेपुढे यावा लागेल. लोकसभेत भाजपच्या पुढाकाराने एक अर्ज सभापतींसमोर केला गेला आहे. राज्यसभेतही असाच अर्ज करून आपणच भ्रष्टाचाराविरुद्ध लढत आहोत हे दाखवण्याचा भाजपचा प्रयत्न होता. पण तिथे विरोधकांच्या ५० खासदारांनी असा अर्ज धनखड यांच्यापुढे केला व त्यांनी त्याची घोषणा करून टाकली. यामुळे मोदी व शाह नाराज झाल्याचे म्हणतात.

## सप्टेंबरात काय होणार?

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यादव यांनी हा देश हिंदूंचाच असल्याचे काही महिन्यांपूर्वी म्हटले होते. त्यांच्याविरुध्दचा एक प्रस्तावही विरोधकांनी धनखड यांच्यापुढे पाठवलेला आहे. तो स्वीकारण्याला अर्थातच भाजपचा विरोध आहे. पण नियमांनुसार पाहिल्यास वर्मा यांच्या जोडीनेच यादव यांना काढण्याचा प्रस्तावही आज ना उद्या घ्यावा लागलाच असता. या संदर्भात धनखड यांनी जी घाई केली त्यामुळे भाजपच्या हिंदुत्ववादी अजेंड्याला धक्का बसणार आहे. त्यातूनच मोदी यांनी बहुदा हा टोकाचा निर्णय घेतला असावा. धनखड हे मूळचे जनता दल व काँग्रेसचे. २००३ नंतर ते भाजपमध्ये आले. बंगालचे राज्यपाल म्हणून त्यांनी ममता बॅनर्जींना अतोनात त्रास दिला. बॅनर्जींच्या सरकारवर सतत टीका केली, भ्रष्टाचाराची कथित प्रकरणे उघड केली व तिथे राष्ट्रपती राजवटीची शिफारस करावी लागेल असेही सतत सूचित केले. नंतर त्यांनी मोदींची स्तुती करून त्यांच्या दरबारात प्रवेश केला. अलिकडे सर्वोच्च न्यायालयावर त्यांनी सतत हल्ला केला. न्यायालयापेक्षा संसद श्रेष्ठ आहे असे ते म्हणत राहिले. हे सर्व मोदींना आवडेल असेच होते. राज्यसभेत विरोधकांना अजिबात बोलू न देणे, मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासारख्या ज्येष्ठांचा अपमान करणे, जया बच्चन यांना अमिताभ यांचे नाव घेऊन डिवचणे असले उद्योग त्यांनी सतत केले. अध्यक्षपदावरून त्यांनी मोदी सरकारला पूर्ण संरक्षण दिले. राजस्थान निवडणुकीच्या काळात त्यांनी उपराष्ट्रपती म्हणून दौरे केले व भाजपचा छुपा प्रचार केला. त्यामुळे त्यांच्या गच्छंतीविषयी कोणाला दुःख वाटण्याचे कारण नाही. मात्र जाता जाता त्यांनी मोदींची हुकुमशाही प्रवृत्ती ज्या रीतीने उघडी पाडली आहे त्याबद्दल दाद द्यायला हवी. मोदी–भक्ती करणाऱ्या वाहिन्यांनाही या घटनेची चर्चा करणे त्यांनी भाग पाडले आहे. भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचा कार्यकाळ केव्हाच संपला आहे. आता तर ते मंत्रीही आहेत. तरीही त्यांच्या जागी नवीन अध्यक्ष निवडणे भाजपला शक्य झालेले नाहीत. यामागे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा मोठा दबाव आहे अशी जोरदार चर्चा आहे. संघाला स्वतःचा माणूस तेथे बसवायचा आहे असे म्हणतात. या पदासाठी मोदींचे कट्टर विरोधक संजय जोशी यांच्या नावाचा आग्रह संघाने धरला आहे अशीही अफवा आहे. संघाला मोदी डोईजड झाले आहेत हे उघड आहे. त्यांना शह कसा देता येईल याच्या मसलती चालू आहेत. धनखड यांच्या राजीनाम्यामुळे दरबाराच्या भिंतीला पडलेल्या भेगेचे इथून पुढे भगदाड होते का हे पाहायचे.

**विचार**

# अहवालानंतरचा वाद काय सांगतो?

***अहमदाबादमध्ये झालेल्या 'एअर इंडिया'च्या विमान अपघाताचा प्राथमिक तपास अहवाल अलिकडेच समोर आला. या अहवालात धक्कादायक गौप्यस्फोट आहेत. मात्र या अहवालावर तज्ज्ञ आणि वैमानिकांच्या संघटनेने आक्षेप घेतला. त्यामुळे केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्र्यांनीही अहवालातून घाईघाईने निष्कर्ष काढू नका, असे जे आवाहन केले, ते अतिशय महत्त्वाचे आहे. नेमके काय घडतेय या प्रकरणात?***



**शिवाजी कराळे**

अहमदाबाद विमान अपघाताचा प्रारंभिक अहवाल एक महिन्यानंतर जाहीर झाला. त्यातील निष्कर्ष धक्कादायक आहेत. वैमानिकांच्या संवादाचा आधार घेऊन विमानाच्या इंजिनला इंधन पुरवठा करणारे स्विच बंद केल्याने हा अपघात झाला असल्याचे म्हटले आहे. त्यातून वैमानिकांवर खापर फोडण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. या विमानाचे दोन्ही वैमानिक अनुभवी होते. त्यांच्याकडून अशी चूक होणे संभवत नाही. 'एएआयबी' (एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्यूरो)ने हा अहवाल प्रसिद्ध केला आहे. हे बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर विमान होते. या अपघातात विमानातील २४१ जणांचा मृत्यू झाला, तर बाहेरील १९ जणांचा मृत्यू झाला. या अपघातात फक्त एकच प्रवासी वाचला. एका वैमानिकाने 'तू स्विच बंद केले का' अशी विचारणा केली, तर दुसऱ्याने 'नाही' असे उत्तर दिले. दोघांपैकी कुणी कुणाला स्विचबाबत विचारले, याचा उलगडा या अहवालातून होत नाही. या अहवालावर वैमानिक संघटनेने संताप व्यक्त केला आहे. समितीत एकही वैमानिक नव्हता आणि त्यांना विश्वासात न घेता आणि तज्ज्ञ वैमानिकाचे म्हणणे न नोंदवताच अहवालात ठपका ठेवण्यात आल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. वैमानिकांची कुटुंबे तसेच अन्य प्रवाशांच्या कुटुंबीयांनीही या अहवालावर नाराजी व्यक्त केली. स्विच कधी बंद करायचा, कधी सुरू करायचा आणि स्विच बंद केला की काय होते याचा परिणाम माहीत असलेले वैमानिक स्वतःसह शेकडो प्रवाशांचा जीव कशाला धोक्यात घालतील, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

अहवालात इंधन 'कटऑफ स्विच' रनवरून 'कटऑफ' मध्ये गेला होता. हा स्विच एका सेकंदात बदलण्यात आला असे म्हटले आहे. दोन्ही इंजिन्सना इंधनपुरवठा थांबला होता. त्यामुळे इंजिनची पॉवर बंद पडली, तेव्हा पंख्यासारखे एक लहान उपकरण आपोआप उघडले. याला 'राम एअर टर्बाइन' (रॅट) म्हणतात. ते आपत्कालीन परिस्थितीत 'हायड्रॉलिक पॉवर' देते. वैमानिकांनी इंजिन पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न केला; परंतु कोसळण्यापूर्वी ते सुरू होऊ शकले नाही. धावपट्टीपासून ०.९ नॉटिकल मैल अंतरावर ते एका वसतिगृहावर कोसळले. 'एएआयबी'च्या अहवालात म्हटले आहे की वैमानिकांची पात्रता शंकेच्या पलिकडे होती आणि दोघेही निरोगी आणि पूर्णपणे तंदुरुस्त होते आणि त्यांना पुरेसा अनुभव होता. इंधन भरण्याच्या स्त्रोतांमध्येही कोणतीही भेसळ आढळली नाही. हवामान पूर्णपणे स्वच्छ होते. विमान उड्डाण करण्यासाठी फ्लॅप सेटिंग (५ अंश) आणि गियर सामान्य होते. आकाशात पक्षी नव्हते. वाराही हलका होता. दृश्यमानता चांगली होती. कोणत्याही प्रकारची कोणतीही अडचण नव्हती. वजनदेखील संतुलित होते, तरीही अपघात झाला.

इंधन स्विचमध्ये संभाव्य बिघाडाबद्दल 'एफएए'कडून एक सल्ला देण्यात आला होता; परंतु सात वर्षांपूर्वीचा हा सल्ला 'एअर इंडिया'ने विचारात घेतला नाही. त्या वेळी ही कंपनी भारत सरकारच्या मालकीची होती. आताच्या अहवालात म्हटले आहे की दोन्ही वैमानिकांकडे आवश्यक परवाने होते. त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. त्यात ते निरोगी आढळले. दोन्ही वैमानिकांना विमान उडवण्याचा चांगला अनुभव होता. 'फेडरल एव्हिएशन ॲडमिनिस्ट्रेशन' ही अमेरिकन सरकारी एजन्सी आणि बोईंग यांनी जारी केलेल्या एका अधिसूचनेत म्हटले आहे, की बोईंग विमानांचे इंधन स्विच लॉक पूर्णपणे सुरक्षित आहेत. इंधन नियंत्रण, स्विचचे डिझाइन, लॉकिंग वैशिष्ट्ये वेगवेगळ्या बोईंग विमानांमध्ये सारखीच आहेत. आम्ही ही धोकादायक परिस्थिती मानत नाही. अहमदाबाद-लंडन विमान अपघाताच्या प्राथमिक अहवालानंतर 'एफएए' आणि बोईंगने अधिसूचना जारी केली. त्यात इंजिन इंधन कटऑफ स्विचवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. 'एअर इंडिया'ने २०१९ मध्ये 'बोईंग'च्या सूचनांनुसार अहमदाबाद-लंडन बोईंग ७८७-८ उड्डाणाचे थ्रॉटल कंट्रोल मॉड्यूल (टीसीएम) गेल्या सहा वर्षांमध्ये दोनदा बदलले आहे. अहवालात असेही उघड झाले की, उड्डाणापूर्वी फ्लाइटच्या सेन्सरमध्ये समस्या होती. ती दुरुस्त करण्यात आली होती. प्राथमिक अहवालात कोणताही अंतिम निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. अंतिम अहवाल कदाचित एक किंवा दोन वर्षांनी येईल. त्यात या अपघाताचे खरे कारण कळू शकेल. या विमान अपघातात एकूण २७० लोकांचा मृत्यू झाला. यामध्ये २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्सचा समावेश होता. फक्त एक प्रवासी वाचला. १५ पानांच्या अहवालानुसार, टेक ऑफपासून अपघातापर्यंत संपूर्ण उड्डाण फक्त ३० सेकंद चालले. अहवालात बोईंग ७८७-८ विमान आणि इंजिनबाबत कोणत्याही ऑपरेटरला कोणताही इशारा किंवा कारवाई करण्याची शिफारस केलेली नाही. दोन्ही वैमानिक मुंबईचे होते आणि आदल्या दिवशी अहमदाबादला पोहोचले होते. उड्डाणापूर्वी त्यांनी पुरेशी विश्रांती घेतली होती. या उड्डाणाचे पायलट सुमित सभरवाल होते तर सहवैमानिक क्लाइव्ह कुंदर होते. सुमितला ८,२०० तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव होता. सह-वैमानिकाला १,१०० तासांचा उड्डाणाचा अनुभव देखील होता. म्हणजेच दोघेही अनुभवी पायलट होते. इंजिन बिघाड झाल्यास इंजिन मॅन्युअली रीस्टार्ट करण्यासाठी आणि बंद करण्यासाठी चर्चीत स्विचचा वापर केला जाऊ शकतो. सोप्या भाषेत, विमानाचे इंजिन चालू ठेवण्यासाठी स्विच चालू आहे आणि ते बंद ठेवण्यासाठी ते कटऑफवर आहे. 'एआय १७१' हे बोईंगचे ७८७-८ ड्रीमलाइनर विमान होते. यामध्ये दोन्ही इंधन स्विच थ्रस्ट लीव्हरच्या अगदी खाली बसवलेले असतात; परंतु येथे एक गोष्ट समजून घेणे महत्त्वाचे आहे की, हे स्विच तुमच्या घरात बसवलेल्या स्विचसारखे नसतात. विमानाची इंधन स्विच सिस्टीम फेल-प्रूफ बनवली जाते. त्याला चालण्यासाठी किंवा कट ऑफ करण्यासाठी एक प्रक्रिया आवश्यक असते. हे इंधन स्विच स्प्रिंग लोड केलेले असतात. इंधन स्विच 'कट ऑफ'मधून सुरु करण्यासाठी आणायचा असेल, तर स्विच थोड्या जोराने बाहेर खेचून नंतर रन मोडमध्ये आणता येतो. त्याचप्रमाणे, रन मोडमधून कटऑफ मोडमध्ये जाण्यासाठी, स्विच बाहेर काढता येतो आणि नंतर कटऑफ मोडमध्ये आणता येतो. सोप्या भाषेत सांगायचे तर, स्विचच्या खाली असलेल्या स्प्रिंग्ज चुकून मोड बदलण्यापासून रोखण्यासाठी असतात आणि मानवी चुकीची शक्यता नगण्य असते.

'फेल-प्रूफ सिस्टीम'मुळे तज्ज्ञ इंधन स्विच चुकून बंद होण्याची शक्यता नाकारत आहेत. विमान वाहतूकतज्ज्ञांच्या मते आतापर्यंतच्या तपासात समोर आलेल्या तथ्यांवरून असे म्हटले आहे की इंजिनचा इंधन स्विच बंद होता. इंधन स्विच स्वतः बंद करणे शक्य नाही. दोन्ही इंजिनचे इंधन स्विच वेगळे आहेत आणि स्विच झाकलेला आहे. अशा परिस्थितीत, ज्याने स्विच बंद केला तो विमानाशी परिचित होता. कॉकपिटमध्ये किती लोक होते किंवा ज्याने स्विच बंद केला, तो कोण होता हा सर्व अजूनही तपासाचा विषय आहे. हे विमान जास्त उंचीवर असते तर वाचले असते. पायलटला स्विच चालू करण्यासाठी आणि सिस्टीम रीबूट करण्यासाठी ३० ते ४० सेकंद लागतात. ज्याने स्विच बंद केला त्यालादेखील हे माहित होते. येत्या काळात तपासात आणखी काही गोष्टींवर प्रकाश पडू शकतो. तपासात आतापर्यंत इतर सर्व शक्यता नाकारल्या गेल्या आहेत. स्विच कसे बंद झाले? तांत्रिक बिघाडामुळे की मानवी हस्तक्षेपामुळे? कारण विमानाची रचना अशी आहे, की हे स्विच आपोआप चालू किंवा बंद होऊ शकत नाहीत. खरे कारण काळानुरुप समोर येईल. यात काही दुय्यम कारणेदेखील असू शकतात. कारण अपघात अनेकदा अनेक कारणांच्या एकत्रिकरणामुळे होतात. म्हणून, खूप सखोल चौकशीची आवश्यकता आहे. आता हे स्विचेस कटऑफ मोडमध्ये कसे आले आणि त्यामागील सिस्टीममध्ये काही यांत्रिक बिघाड, अनवधानाने मानवी चूक किंवा इतर कोणतीही समस्या होती का, याचा तपास केला जात आहे. हे कोडे उलगडेल तव्हाच एखाद्या निष्कर्षाप्रत पोहोचणे शक्य होईल.

**चर्चा आजची**

# रस्ते चांगले झाले तर खिसे कसे भरणार?

**संतोष राऊळ**

पावसाळा आला की रस्त्यावर गाड्या कमी आणि खड्डेच जास्त दिसतात. जोपर्यंत मुसळधार पावसाची सुरूवात होत नाही तोपर्यंत संबंधित प्रशासन आणि स्थानिक लोक प्रतिनिधी रस्ता आहे की हरवला, हे ढुंकूनही पाहत नाहीत. मात्र, एखादा अपघात घडला किंवा तक्रारी वाढल्या की त्यांना खडबडून जाग येते. आणि मिळालेल्या निधीच्या तुलनेत तात्पुरत्या स्वरूपात रस्त्याची निकृष्ट मलमपट्टी केली जाते. त्यामुळे ठेकेदारासह संबंधित प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संगमताने प्रचंड भ्रष्टाचार होत असल्याची चर्चा प्रवासी वर्गातून होत आहे. तसेच, रस्ते चांगले झाले तर खिसे कसे भरणार, अशीही चर्चा होत आहे.

नव्याने रस्ता बनविणे किंवा डागडूजी करण्याची वेळ नोव्हेंबर ते मे महिन्याच्या मध्यापर्यंत असते. मेच्या शेवटच्या आठवड्यात पावसाची सुरूवात होते. त्यात डांबर आणि पाण्यात हाडवैर आहे. पाऊस पडला की रस्त्यावरील डांबर निघते. असे असताना देखील काही ठिकाणी भर पावसात रस्त्याची कामे केली जातात. नुसते बिलं काढण्यासाठी भर पावसात ठेकेदारांकडून आणि संबंधित प्रशासनाकडून रस्त्याची कामे केली जात असल्याचा आरोप प्रवासी वर्गातून होत आहे. तसेच, त्यांना नोव्हेंबर ते मे महिन्याच्या कालावधीत रस्त्याच्या कामांची आठवण का पडत नाही, असा संतप्त सवालही उपस्थित होत आहे.

यंदा मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने सुरूवात केली. तोपर्यंत जिल्ह्यातील मुख्य रस्ते सुस्थितीत होते. मात्र, मुसळधार पाऊस पडायला लागला आणि रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदारांच्या निकृष्ट कामावरील पडता उघडला गेला. परंतु, तरी देखील संबंधित प्रशासन आणि स्थानिक लोक प्रतिनिधी मुग गिळून बसत असल्याचे प्रवासी वर्गासह त्या-त्या भागातील नागरिकांमधून बोलले जात आहे. काही रस्ते असे आहेत की, दरवर्षी पावसाळ्यात त्या ठिकाणी भयावह खड्डे पडतात. दरवेळेला खड्डा पडलेल्या रस्त्याची मलमपट्टी केली जाते. मात्र पाऊस सुरू होताच परिस्थिती जैसे थेच होऊन जाते. त्यामुळे संबंधित प्रशासनाने पावसाळ्याच्या आधी रस्त्याचे परिक्षण करून त्यावर योग्य ती उपाययोजना करण्यात आली पाहिजे. मात्र, तसे न करता पावसाळ्यात अजून जास्त खड्डे कसे पडतील, असा विचार करत तात्पुरती मलमपट्टी केली जाते. अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी महत्वाची शासकीय कार्यालये असल्यामुळे जिल्ह्याभरातून नागरिक शासकीय कामासाठी याठिकाणी येत असतात. परंतु, त्यांच्या राहत्या ठिकाणापासून ते अलिबागमध्ये येईपर्यंत त्यांची हाडं खिळखिळी होत आहेत. आता आलो खरे, पण परत घरी व्यवस्थित पोहोचू की नाही, याची देखील त्यांना खात्री वाटत नाही. त्याला कारण म्हणजे रायगड जिल्ह्याला लागलेले खड्ड्यांचे ग्रहण. जिल्ह्यासह अलिबाग तालुक्यातील काही ठिकाणचा रस्ता अक्षरशः शोधावा लागत आहे. एवढे भयंकर खड्डे पडले आहेत की, वाहनचालकांना ते खड्डे पाहूनच धडकी भरत आहे. दरवर्षी त्याच त्याच ठिकाणी खड्डे पडत असून देखील प्रशासनाचे त्याकडे लक्ष जात नाही, याचे आश्चर्य वाटत आहे. त्या खड्ड्यांमुळे शारिरिक दुखण्यांसह जीवही गमवावा लागला आहे. एखादा मोठा अपघात किंवा आंदोलन केल्याशिवाय संबंधित प्रशासनाला जागच येत नसल्याचे प्रवासी वर्गातून बोलले जात आहे.

अलिबागसारख्या शहरातील रस्त्यांची अवस्था एवढी बिकट असेल तर जिल्ह्यातील उर्वरित रस्त्यांचे काय हाल असतील? अलिबागचे स्थानिक लोकप्रतिनिधी ज्यांना लोकांनी निवडून दिलंय, ते देखील गप्प बसलेत. खरतर त्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले पाहिजे. परंतु, तसे होताना कुठे दिसत नाही. खड्ड्यांबाबतीत कुणाला जाग आलीच तर भर पावसात ते खड्डे बुजविण्याची तसदी घेतात. तेपण निकृष्ट दर्जाचे. रेवदंडा-अलिबाग-पेण या मार्गावर असंख्य खड्डे पडले आहेत. स्थानिक आणि प्रवासी वर्गातून आंदोलने केल्यानंतर रस्त्याच्या ठेकेदारांनी खड्डे भरण्यास सुरूवात केली. मात्र, ते खड्डे बुंजविण्यासाठी बारीक खडी, दगड, माती, मुरूम आणि रेचग्याचा वापर करतात. त्यामुळे मुसळधार पाऊस आला की खड्डा बुजविण्यासाठी टाकण्यात आलेला माल वाहून जातो आणि संपुर्ण रस्त्यावर पसरतो. त्यामुळे देखील अपघात आणखी वाढ होते. नुकतेच अलिबाग तालुक्यातील कुरूळ जवळील रस्त्यावरील खड्डे देखील अशाच पद्धतीने भरण्यात आले होते. त्यावर टाकल्या गेलेल्या मालामुळे तर अपघाताची शक्यता आणखीनच वाढली होती. त्यामुळे संबंधित प्रशासन आणि ठेकेदार कोणत्या धुंदीत असे निर्णय घेतात, असा प्रश्न प्रवासी वर्गाला पडत आहे.

त्यामुळे असे काही धाडसी निर्णय घ्यायचे असतील तर पाऊस पडण्यापूर्वीच घेत जा. ऐन पावसात असले निर्णय जिव घेऊ शकतात. हे सर्व पहता सत्तेतील लोकप्रतिनिधी काहीच आवाज उठवत नसल्याने त्यांच्यासह संबंधित प्रशासन अधिकारी आणि रस्त्याच्या ठेकेदारांची मिलीभगत असल्याचे उघड आहे. तसेच, रस्ता जर चांगला केला तर सारखी सारखी बिलं काढणार कुठून? त्यामुळे एकमेकांचे खिसे भरण्यासाठीच दरवर्षी तेच तेच खड्डे त्यांच्याकडून भरले जात असल्याचा आरोप प्रवासी वर्गासह स्थानिकांमधून केला जात आहे.

**लोकसंसद**

## मुसळधार पाऊस, घाणीचे साम्राज्य आणि रोगराई

मुंबईसह राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पावसामुळे एकीकडे जागोजागी खड्ड्याची निर्मिती होत असताना दुसरीकडे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. रस्त्यांवर साचलेल्या पाण्यात कचरा आणि सांडपाणी मिसळल्यामुळे अनेक ठिकाणी दुर्गंधी पसरली आहे. विशेषतः अतिक्रमण केलेले रस्ते आणि फुटपाथ, मंडई, बाजारपेठांमध्ये कुजलेला भाजीपाला रस्त्यावर टाकल्यामुळे आणि इतर कचऱ्यामुळे अस्वच्छता आणि घाणीची समस्या अधिक गंभीर झाली आहे. या दूषित पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होऊन मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया अशा आरोग्याला घातक अनेक आजारांना आमंत्रण मिळू शकते. स्थानिक पालिका प्रशासनाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून साचलेले दूषित पाणी तेथून काढून टाकणे, कचऱ्याचा ढीग हलवणे, डासांची उत्पत्ती होऊ नये यासाठी डासांची पैदास होणारी ठिकाणे नष्ट करणे, डास प्रतिबंधक उपाययोजना करणे इत्यादी उपाययोजना करणे गरजेचे आहे. घाणीचे साम्राज्य आणि रोगराई हातात हात घालून जात असल्यामुळे आरोग्यावर अनेक दुष्परिणाम होतात. नागरिकांनीही अशावेळी जागृत राहून स्वतःची काळजी घेणे आवश्यक आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## सायलेंट किलर ड्रॅगन

गलवान खोऱ्यातील संघर्षानंतर चीनच्या प्रत्येक हालचालीवर करडी नजर ठेवत भारताने सीमेवर पायाभूत सुविधांच्या निर्मितीचा वेग मोठया प्रमाणात वाढवला आहे. याचाच एक भाग म्हणून चिनी सैन्याच्या टेहळणी पासून पूर्णपणे सुरक्षित असलेला लडाखमधील दौलत बेग ओल्डी (डीबीओ) या सामरिकदृष्टया अत्यंत महत्वाच्या क्षेत्राला जोडणारा पर्यायी मार्ग पुढील वर्षी वाहतुकीसाठी सुरू होणार आहे.या नव्या रस्त्यामुळे भारतीय लष्कराला सैन्य आणि रसद पुरवठा अधिक वेगाने आणि सुरक्षित करता येणार आहे. सध्याचा मार्ग  दारबुक-श्योक-डीबीओ चीनच्या थेट नजरेत येतो. ज्यामुळे लष्करी हालचाली गोपनीय ठेवण्यात अडचणी येतात.यावर मात करण्यासाठी सीमा रस्ते संघटना १३० किलोमीटर लांबीचा ससोमा-सासेर ला-सासेर ब्रांगसा-गपशन-डीबीओ हा नवा मार्ग वेगाने पूर्ण करत आहे. नवा मार्ग केवळ वेळेची बचत करणार नाही. दौलत बेग ओल्डी येथे १६,६१४ फूट उंचीवर जगातील सर्वांत उंच हवाई पट्टी आहे. काराकोरम पास आणि वादग्रस्त देपसांग खोऱ्याच्या जवळ असल्यामुळे या भागाचे सामरिक महत्व अनन्यसाधारण आहे.

**– दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई**

**दिनविशेष**

# सच्चे रंगकर्मी – जयंत सावरकर!

मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचा आज दुसरा स्मृतिदिन. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे  २४ जुलै  २०२३ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले होते. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या अभिनयाचे रंग भरणाऱ्या जयंत सावरकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीची मोठी हानी झाली.  त्यांच्या निधनाने रंगभूमीची अविरत सेवा करणारा  सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला. ३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेले जयंत सावरकर हे नोकरीसाठी मुंबईत आले. काही काळ त्यांनी मुंबईत नोकरीही केली मात्र अभिनयाचे बाळकडू पिलेल्या जयंत सावरकर यांचे मन नोकरीत रमले नाही. नोकरी सोडून ते नाटकात काम करू लागले. नोकरी सोडून त्यांनी नाटकात काम करणे हे त्यांच्या सासऱ्यांना आवडले नाही. जयंत सावरकर मात्र अभिनय करण्यावर ठाम राहिले. रंगभूमीवर त्यांना जी भूमिका मिळत गेली ती त्यांनी निष्ठेने पूर्ण केली. सुरवातीचे काही वर्ष तर त्यांनी बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणूनच काम केले मात्र आपल्यालाही आपल्या क्षमतेप्रमाणे नाटकात अभिनय करण्याची संधी मिळेल असा विश्वास त्यांना होता याच विश्वासाच्या जोरावर त्यांना भूमिका मिळत गेल्या. आपल्याला मिळणाऱ्या भूमिकांची लांबी किती मोठी आहे हे त्यांनी कधीही पाहिले नाही. जयंतराव भूमिकेच्या लांबीपेक्षा भूमिकेची रुंदी पाहत म्हणूनच त्यांना काही नाटकात छोट्या भूमिका मिळाल्या मात्र या छोट्या भूमिकेतही त्यांनी स्वतःच्या अभिनयाची छाप सोडली त्यामुळे लवकरच मराठी रांगभूमिवरील एक प्रख्यात अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांना अनेक नाटकात मुख्य भूमिका मिळाल्या त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले. एकच प्याला मधील तळीराम, तुझं आहे तुझ्यापाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतु बर्वा आणि हरितात्या या त्यांनी केलेल्या भूमिका अजरामर ठरल्या. जुन्या काळातील मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते आजच्या काळातील चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम यासारख्या सर्वच दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनात त्यांनी काम केले. त्यांनी अभिनय केलेले सौजण्याची ऐसीतैशी, टिळक-आगरकर, ययाती-देवयानी, सूर्यास्त ही नाटके खूप गाजली जवळपास १०० हुन अधिक नाटकात भूमिका केलेल्या जयंतरावांनी ३० हुन अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत. दूरचित्रवाणीवरील काही मालिकातही त्यांनी भूमिका केल्या आहे. नाटक, चित्रपट, मालिका अशा तिन्ही ठिकाणी आपल्या अभिनयाचे रंग भरणारे जयंतराव मात्र प्रेक्षकांना भावले ते नातकातच! सहज सोपा अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकण्याची त्यांची खासियत होती म्हणूनच त्यांचा अभिनय पाहताना हा माणूस आपल्या घरातीलच एक व्यक्ती असल्याचा भास प्रेक्षकांना होत असे. त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना  जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे. १९९७ साली झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. एक छोटा माणूस या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या निधनाने पाच दशकांहून काळ रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला आहे. जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# संगमेश्वर महामार्ग, मृत्यूचा सापळा

## • ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अपघातांची मालिका सुरुच; नागरिकांमध्ये संताप

**। संगमेश्वर । प्रतिनिधी ।**

संगमेश्वरपासून काही अंतरावर असलेल्या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील ओझरखोल येथे वळणाजवळ मोठा खड्डा पडला आहे. त्यामुळे अपघाताचा संभाव्य धोका निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी याच ठिकाणी एसटी बस आणि मिनी बसमध्ये भीषण अपघात झाला होता. या घटनेनंतर जाग आलेल्या ठेकेदाराने तातडीने डायवर्जन रस्ता तयार केला. मात्र, तो निकृष्ट दर्जाचा असल्याचे उघड होत असल्याने अपघातांची मालिका सुरुच आहे.

काही दिवसांपूर्वी याच मार्गांवर अपघातात मिनी बस चालक किरण रहाटे कॅबिनमध्ये अडकून पडले होते. पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी तब्बल तासभर प्रयत्न करून त्यांना बाहेर काढले. या अपघातात अनेक प्रवासी जखमी झाले होते. घटनास्थळी वळण मार्ग व दिशादर्शक फलक नसल्यामुळे एसटी बस चुकीच्या दिशेने गेली आणि अपघात घडल्याचे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले. त्यानंतर ठेकेदाराच्या निष्काळजीपणावर संतप्त जमावाने रोष व्यक्त करत ठेकेदाराच्या नावाने जोरदार संताप व्यक्त केला.

### रस्त्याकडे प्रशासनाची डोळेझाक

**तळेकांटे ते आरवली दरम्यान सुरु असलेल्या महामार्गाच्या कामांबाबत सातत्याने जनतेतून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ठेकेदाराच्या मनमानी आणि कामातील निकृष्टपणा याबाबत नागरिक ओरड करत असूनही संबंधित प्रशासन डोळेझाक करत आहे. यामुळे फक्त ठेकेदारालाच नव्हे, तर त्याच्या पाठिशी उभ्या असलेल्या अधिकाऱ्यांनाही जबाबदार धरावे, अशी मागणी होत आहे.**

अपघात घडल्यानंतर ठेकेदाराने काही प्रमाणात सुधारणा केली. अपघातस्थळाजवळील नादुरुस्त वळण दुरुस्त करून दिशादर्शक फलक लावण्यात आले. मात्र, ही सुधारणा केवळ वरवरची असल्याचे दोन दिवसांतच उघड झाले. वळण रस्त्यावर टाकलेली खडी पावसामुळे वाहून गेली असून, रस्त्यावर मोठा खड्डा पडून त्यात पाणी साचले आहे. परिणामी, वाहनचालक गोंधळून अपघात होत आहेत.

एसटी आणि मिनी बस अपघाताच्या अवघ्या चौथ्या दिवशी, त्याच भागात स्विफ्ट कार आणि दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील दोघे गंभीर जखमी झाले. रस्त्याची स्थिती पाहून नेमका रस्ता आहे की पाण्याचे तळे, असा संभ्रम निर्माण होत आहे. अशा संभ्रमात सापडलेल्या स्विफ्ट चालकाने चुकीच्या दिशेने गाडी नेल्यामुळे अपघात झाला, असे बोलले जात आहे.



**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२४ जुलै

१) श्रीम. आशा काशिनाथ म्हात्रे
ठीकरुळ नाका, अलिबाग
२४-०७-१९४७

२)श्री.प्रशांत वसंत घरत,
रोहिदासनगर, चेंढरे-अलिबाग
२४-७-१९५५

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**तरुण नंदकुमार सक्सेरिया, मुंबई**

**डॉ. प्रशांत प्रकाश लोखंडे, वाढदिवस, चेंढरे, अलिबाग**

**सचिन गजराज जैन, अलिबाग**

**श्रीमती रेखा पुनतांबेकर, मुंबई**



# ऋतूज माळीची जर्मनीतील कंपनीत निवड

## इंडो-जर्मन कराराअंतर्गत ऑफर लेटर वितरण

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

सावर्डे येथील सह्याद्री पॉलिटेक्निक महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील गुणवंत विद्यार्थी ऋतूज माळी याची निवड जर्मनीमधील नामांकित कंपनीत झाली आहे. ही निवड महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास व रोजगार विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या इंडो-जर्मन करार कार्यक्रमांतर्गत झाली आहे. राज्याचे कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन मंत्री मा. मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते ऋतूजला औपचारिकरित्या ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. या गौरवप्रसंगी राज्यस्तरावरून तसेच स्थानिक पातळीवरून ऋतूजच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




# राऊत पाड्याच्या नशिबी चिखलवाट

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

भिवंडी तालुक्यातील खंबाळा ग्रामपंचायत हद्दीतील राऊत पाड्यातील ग्रामस्थांसह विद्यार्थ्यांचा खडतर प्रवास सुरूच आहे. डांबरी रस्ता नसल्याने पावसाळ्यात ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांना चिखलातून वाट काढावी लागत आहे.

राऊत पाड्यात २०० हून अधिक लोकांची वस्ती आहे. हा पाडा ग्रुप ग्रामपंचायत खंबाळा आणि दाभाड या दोन ग्रामपंचायत हद्दीत येत आहे. या पाड्यातील नागरिकांना ये-जा करण्यासाठी मुख्य रस्ता हा दोन्ही ग्रामपंचायत हद्दीतून जात आहे. परंतु काही शेतकऱ्यांच्या जागा या कच्च्या चिखल पायवाट रस्त्यामध्ये येत आहेत. त्यामुळे हे शेतकरी रस्ता बांधकामासाठी मज्जाव करीत असल्याची माहिती मिळत आहे.

विशेष म्हणजे खंबाळा, दाभाड ग्रामपंचायत प्रशासनाने राऊत पाड्यातील रस्ता व्हावा याकरिता भिवंडी तहसीलदार कार्यालयात लेखी निवेदनाद्वारे प्रस्ताव सादर केला आहे. ग्रामपंचायतीच्या निवेदनानुसार राऊत पाडा, परशुराम पाड्याकरिता रस्ता वहिवाटीचा असून तो डांबरी किंवा काँक्रीटीकरण करून तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे. रस्ता तात्काळ न बनवल्यास राऊत पाड्यातील विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशाराही दिला आहे. त्यामुळे यावर्षी तरी राऊत पाड्यातील विद्यार्थी आणि ग्रामस्थांची चिखलातील वाट मोकळी होणार का? याकडे येथील ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.



### सुवर्णकण



संत आपल्या सत्तेने साधकांना योग्य मार्ग दाखवतात. साधकाची पूर्ण तयारी करुन घेणे ही त्यांची कळकळ असते.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण.**

# अर्नाळा समुद्रकिनारा धोक्यात

**। वसई । प्रतिनिधी ।**

बेकायदा वाळू उपसा आणि पावसाळ्यात उधाणाच्या दिवसात लाटांचा किनाऱ्याला आणि सुरुच्या बागांना बसणारा तडाखा याने अर्नाळा समुद्रकिनारा धोक्यात आला असून याचा सर्वात जास्त फटका सुरुच्या बागांना आणि पर्यटनाला बसताना दिसत आहे. यावर उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

विरार पश्चिमेला प्रसिद्ध अर्नाळा समुद्रकिनारा असून सुट्टीच्या दिवशी आणि शनिवार आणि रविवार या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक फिरण्यासाठी येत असतात. मात्र, बेकायदा वाळू उपसा आणि लाटांचा तडाखा बसून समुद्रकिनारा धोकादायक झाला आहे. मोठ्या खड्ड्यांमुळे आणि उंच-सखल भागांमुळे भरतीच्या वेळी पाण्याचा आणि खोलीचा अंदाज न आल्याने पर्यटकांचा बुडून मृत्यू झाला आहे. अशा अनेक घटनांमुळे पर्यटकांची सुरक्षितता लक्षात घेऊन यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



अर्नाळा किनाऱ्यापासून ते नवापूर किनाऱ्यापर्यंत मोठी सुरुची बाग आहे. मात्र, बंधारा नसल्याने भरतीच्या आणि उधाणाच्या लाटांचा तडाखा बसून अनेक सुरुची झाडे उन्मळून पडतात. यामुळे भरतीचे पाणी आत येऊन किनाऱ्याची धूप होते. यामुळे सुरुच्या बागेला धोका निर्माण झाला आहे. प्रशासनाने यावर तातडीने उपाययोजना न केल्यास इथला किनारा उद्ध्वस्त होऊन पर्यटन धोक्यात येण्याची भीती अर्नाळा येथील सामाजिक कार्यकर्ते निनाद पाटील यांनी व्यक्त केली आहे.

### बंधाऱ्याअभावी किनाऱ्याची धूप

### तरुण बेपत्ता

**राजापूर :** राजापूर तालुक्यातील जांभवली नारकरवाडी येथील ग्रामस्थ योगेश प्रकाश तळेकर (३०) हे १२ जुलै रोजी कोणालाही काहीही न सांगता घरातून सायंकाळी ५ वा. सुमारास निघून गेलेले आहेत. अद्याप ते घरी परत न आल्याने योगेश यांच्या पत्नी योगिनी तळेकर यांनी राजापूर पोलीस स्थानकांत याबाबत तक्रार दाखल केली आहे. तळेकर यांनी सफेद रंगाचा टी शर्ट व काळी पैंट परिधान केलेली आहे. याबाबत कोणाला माहीती मिळाल्यास त्वरित राजापूर पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन राजापूर पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# इमारतीवरून पडून चिमुकलीचा मृत्यू

**। वसई । प्रतिनिधी ।**

नायगावमध्ये एका इमारतीच्या बाराव्या मजल्यावरून खाली पडून चार वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. ही घटना मंगळवारी (दि. २२) रात्री साडेआठच्या सुमारास घडली.

नायगाव पूर्वेच्या भागात नवकार इमारत आहे. या इमारतीच्या फेज वनमधील ए ३ विंगमध्ये बाराव्या मजल्यावर राहत असलेल्या प्रजापती कुटुंबियांकडे मंगळवारी रात्रीच्या सुमारास अन्विका आली होती. याच दरम्यान खेळत असताना ती चप्पल ठेवण्याच्या स्टँडवर बसली होती. त्याला लागूनच असलेली खिडकी उघडी असल्याने तिचा अचानक तोल गेला आणि ती खाली पडली. तिला तात्काळ उपचारासाठी वसईच्या सर डी एम पेटिट रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, त्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

या घटनेमुळे नायगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करून पुढील तपास सुरू आहे.

### जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा बेजबाबदारपणा

**। छ. संभाजीनगर । प्रतिनिधी ।**

छत्रपती संभाजीनगरमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात एका महिलेची सोनोग्राफी करायची होती. मात्र डॉक्टर झोपले असल्याने सोनोग्राफी करण्यास नकार दिला गेला. तब्बल एक तासापेक्षा जास्त वेळ महिला रुग्णालयात सोनोग्राफीसाठी प्रतीक्षा करत उभा होती. महिलेला तीव्र वेदना होत असल्याने ती सोनोग्राफी करण्यासाठी रुग्णालयात आली होती. परंतु, तेथील नर्सने डॉक्टर झोपले आहेत, ते संध्याकाळी जेव्हा उठतील तेव्हा सोनोग्राफी होईल. तोवर मी तुम्हाला काही गोळ्या देते असे सांगितले. रुग्णालयातील या प्रकाराचा व्हिडिओ एका रुग्णाच्या नातेवाइकाने काढला असून तो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

जिल्हा सामान्य रुग्णालय हे मराठवाड्यातील गोरगरीब आणि मध्यमवर्गीय लोकांसाठी मोठा आधार आहे. मात्र, लाखो रुपये पगार घेणाऱ्या डॉक्टरांकडून असा बेजबाबदारपणा केला जात आहे. रुग्णांना ताटकळत उभे ठेवले जात असल्याच्या प्रकाराने संताप व्यक्त केला जात आहे.

# पेढांबे येथे वृक्षारोपण

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

ग्रामपंचायत पेढांबे, अर्थ फाऊंडेशन चिपळूण व सामाजिक वनीकरण चिपळूण यांच्या वतीने ग्रामपंचायत पेढांबे ते सुकाई देवी मंदिर रस्ता येथे सोमवारी (दि. २१) दुपारी वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी पेढांबे गावात वड, पिंपळ, उंबर, भेडा, जांभूळ, जरुळ व अर्जुन अशा देशी प्रजातींच्या १०० रोपांची लागवड करण्यात आली. तसेच, यावेळी ग्रामसंघाच्या सर्व महिला यांची विशेष बैठकदेखील आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीमध्ये अर्थ फाऊंडेशनचे व शासनाचे कृषी अधिकारी मनोज गांधी व पंचायत समिती ग्रामविस्तार अधिकारी अमोल पाटील यांनी बचत गट याची ध्येय उद्दिष्ट व आर्थिक सबलता यासोबत वृक्षारोपण, वृक्ष संवर्धनाचे महत्व आणि यातील भगिनीची भूमिका याबाबत सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले. या वेळी पेढांबे गावात वड, पिंपळ, उंबर, भेडा, जांभूळ, जरुळ व अर्जुन अश्या देशी प्रजातींच्या १०० रोपांची लागवड करण्यात आली. ग्राम संघ अध्यक्ष सौ रजनी कदम यांनी आपल्या सर्व महिला सहकाऱ्यांच्या वतीने या रोपांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारली.



### लोकलवर दरड कोसळली; दोघे जखमी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईहून कसाऱ्याला जाणाऱ्या लोकलवर दरड कोसळल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. कसारा स्थानकाजवळ ट्रॅक बदलत असताना शेजारच्या टेकडीवरील दरड कोसळली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, दरवाजात उभे असलेले प्रवासी बाळू जाधव व तुकाराम जाधव हे गंभीर जखमी झाले. तसेच, या दरडीमुळे लोकललाही काही प्रमाणात धक्का बसला. मोटरमनने अत्यंत सावधगिरी बाळगत ही लोकल कसारा स्थानकापर्यंत आणली. गंभीर दुखापत झालेल्या जखमींना आपत्ती व्यवस्थापन टीम कसाराचे सदस्य प्रमोद वारंगुसे यांनी सहप्रवाशांच्या मदतीने कसारा रेल्वे स्थानकात उतरवले.दरम्यान दरड कोसळल्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# कार, टेम्पोच्या धडकेत दोघे ठार

**। सोलापूर । प्रतिनिधी ।**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय मार्गावरील कोंडीजवळ (राहुटी) मंगळवारी (दि. २३) दुपारी भीषण अपघात झाला. महामार्गावर थांबलेल्या बल्करला बगल देऊन स्वतःला वाचविण्याच्या प्रयत्नात टेम्पोवरील चालकाचे नियंत्रण सुटले आणि टेम्पो दुभाजक ओलांडून दुसऱ्या लेनमध्ये गेला. यावेळी मोहोळकडून सोलापूरच्या दिशेने जाणाऱ्या ओमिनी कारला टेम्पो जोरात धडकला. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे.

सुगरण हॉटेलचे मालक रवींद्र सुभाष वाघमोडे (५१) हे मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास ओमिनी कारमधून (एमएच १३, एझेड ६६८५) चालक अनिल दत्तात्रेय वाघचौरे (३५) याला घेऊन सोलापूरकडे निघाले होते. टोल नाका ओलांडून काही अंतरावर गेले असता राहुटीच्या पुढे अचानक सोलापूरकडून पुण्याच्या दिशेने भरधाव जाणारा टेम्पो (एमएच ४०, डीसी ०१९०) त्याची लेन ओलांडून दुसऱ्या लेनमध्ये आला. अचानक समोर आलेल्या टेम्पोला ओमिनी कारची धडक बसली. त्यात ओमिनीचा समोरील भाग पूर्णपणे चक्काचूर झाला. कारमध्ये समोर बसलेले रवींद्र वाघमोडे व चालक वाघचौरे गंभीर जखमी झाले.

अपघातानंतर कोंडी ग्रामस्थांनी मदतीसाठी अपघातस्थळी धाव घेतली. मात्र, वाघमोडे यांचा जागीच मृत्यू झाला तर कारचालकाने वाटेत प्राण सोडला. महामार्ग पोलिसही काहीवेळात तेथे आले. त्यांनी तातडीने अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.




### विवाहितेवर अत्याचार

**। बीड । प्रतिनिधी ।**

एका पोलीस अधिकाऱ्याने बंदूकीचा धाक दाखवून विवाहितेवर अत्याचार करुन अश्लील फोटो व व्हिडीओ काढल्याची घटना समोर आली आहे. रविंद्र लिंबाजी शिंदे असे अत्याचार करणाऱ्या संशयीत पोलीस अधिकाऱ्याचे नाव आहे. याबाबत ३९ वर्षीय पिडीतेने शहरातील शिवाजी नगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पिडीता व संशयित रवींद्र शिंदे यांची जुनीच ओळख होती. २०१३ मध्ये रात्रीच्या वेळी बळजबरीने घरात घुसून त्याने बंदुकीचा धाक दाखवून अत्याचार केला आणि पिडीतेचे अश्लील व्हिडीओ आणि फोटो काढल्याचे फिर्यादी म्हटले आहे. तसेच, या प्रकाराविषयी कोणाला सांगितले तर तुझ्या पतीला खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकीही दिली.

## क्रांतीकारी कृषी कार्यशाळेचे आयोजन | शेतकऱ्यांना शेतीविषयी मोलाचे मार्गदर्शन

# कात्रोळीत आधुनिक शेतीचे गिरवले धडे

**। चिपळूण । प्रतिनिधी ।**

कात्रोळी कुंभारवाडी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरात सोमवारी (दि. २१) आपला कृषीसखा परिवार यांच्या वतीने कृषी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कृषी कार्यशाळेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यशाळेत भात पिकावरील कीड नियंत्रण, आधुनिक शेती तंत्रज्ञान, नवीन पिकांची माहिती, मृदा परीक्षण, सिंचन व्यवस्थापन आणि विविध सरकारी योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. परिसरातील शेकडो शेतकऱ्यांनी या मार्गदर्शन सत्राचा लाभ घेतला. कार्यशाळेचे मुख्य आकर्षण होते सुप्रसिद्ध कृषी तज्ज्ञ डॉ. पांडुरंग मोहिते यांचे प्रभावी मार्गदर्शन. डॉ. मोहिते यांनी त्यांच्या अनुभवाने आणि सखोल ज्ञानाने शेतकऱ्यांच्या अनेक शंकांचे निरसन केले. त्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान न देता, प्रत्यक्ष शेतात उपयोगी ठरणारी व्यावहारिक माहिती दिली. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधानाचे हास्य हेच या कार्यशाळेच्या यशाची पावती होती.

तसेच, कार्यशाळेतील प्रमुख विषय भात पिकावरील कीड नियंत्रण हा होता. रत्नागिरी जिल्ह्यासह महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात भात पिक घेतले जाते. मात्र, सतत बदलणाऱ्या हवामानामुळे आणि नवीन कीटकांच्या प्रादुर्भावामुळे भात उत्पादकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. डॉ. मोहिते यांनी भात पिकाला साधारणतः कोणत्या किडींचा धोका असतो, त्यांच्या नियंत्रणासाठी कोणत्या जैविक व रासायनिक पद्धतींचा अवलंब करावा यावर सविस्तर विवेचन केले. तसेच, त्यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापनाचे महत्त्व पटवून दिले, ज्यामुळे रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी होऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होईल. याव्यतिरिक्त, मृदा परीक्षण का महत्वाचे आहे, मृदा परीक्षणाचे फायदे काय आहेत आणि त्यासाठी सरकारने कोणत्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, यावरही मार्गदर्शन झाले. या कार्यशाळेमुळे शेतकऱ्यांमध्ये नवीन ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे.



### शासकीय योजनांचे मार्गदर्शन

**शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध सरकारी योजनांची माहिती, जसे की कृषी कर्ज, पीक विमा योजना, शेततळे योजना आणि अनुदानावर मिळणारे कृषी साहित्य याबद्दल सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले, जेणेकरून शेतकऱ्यांना या योजनांचा जास्तीत जास्त लाभ घेता येईल. आपला कृषीसखा परिवारने शेतकऱ्यांसाठी उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे.**

# भांडुपमध्ये संरक्षक भिंत कोसळली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईच्या भांडूप परिसरात मंगळवारी (दि. २२) एक मोठी दुर्घटना घडली. पावसामुळे भांडुपमधील खिंडीपाडा भागात ओमेगा हायस्कूलच्या मागे असलेली एक मोठी संरक्षक भिंत कोसळली. भिंतीसोबत काही घरेही पडली. सुदैवाने, धोक्याची सूचना मिळाल्यानंतर घरांना तातडीने रिकामे करण्यात आले होते. त्यामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही.

गेल्या आठवड्याभरापासून पावसाने जोर धरला असून या मुसळधार पावसामुळे डोंगराळ, टेकड्यांवरील भागांना मोठा फटका बसला आहे. अशातच भांडुपच्या खिंडीपाडा भागात ओमेगा हायस्कूलच्या मागे मंगळवारी संध्याकाळी ५ च्या सुमारास संरक्षक भिंत कोसळली. या भीतीसह पाच घरे ५० फुटांवरून खाली कोसळली. पावसाळ्यात डोंगराळ भागात दरड कोसळ्याची भीती असल्यामुळे तेथील अनेक घरे आधीच रिकामी करण्यात आली होती. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस, महानगर पालिकेचे अधिकारी आणि अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोतल्या. यांनतर त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता तातडीने आजूबाजूच्या परिसरातील लोकांना सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले.

# निवडक



## शुभांगी घुलेंचा सत्कार

**पनवेल** : जागतिक पोलीस व अग्निशमन स्पर्धा २०२५ मध्ये ऐतिहासिक कामगिरी केल्याबद्दल पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशामक शुभांगी घुले यांचा आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी मंगळवार (दि. २२) जुलै रोजी सत्कार करण्यात आला. पनवेल महापालिकेचे नाव जागतिक स्तरावरती उज्वल केल्याबद्दल आयुक्तांनी त्यांचे अभिनंदन केले. नुकत्याच अमेरिकेतील अल्बामा येथे पार पडलेल्या २१ व्या जागतिक पोलीस व अग्निशमन स्पर्धा २०२५ मध्ये महापालिकेच्या अग्निशामन विभागाच्या अग्निशाकम शुभांगी यांनी अल्टिमेट फायर फायटिंग चॅलेंज या खेळात कांस्यपदक मिळवून भारताचे नाव उज्वल केले होते, तसेच फायर स्टेअर रेसमध्ये सांघिक स्पर्धेमध्ये रौप्यपदक मिळवले. तसेच फायर फायटिंग चॅलेंज स्पर्धेत चौथे तर फायर स्टेअर रेस वैयक्तिक स्पर्धेमध्ये पाचवे स्थान पटकाविले. या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पनवेल महानगरपालिकेचे नाव देशपातळीवरती उज्वल केले आहे. यावेळी महापालिकेचे यावेळी अतिरीक्त आयुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, स्वरूप खारगे, अभिषेक पराडकर, मंगेश गावडे, केशव शिंदे, संजय कटेकर, डॉ. आनंद गोसावी, निलेश नलावड, संग्राम व्हारेकाटे, संदिप खुरपे, विलास चव्हाण, डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर, श्रीराम पवार, रमेश चव्हाण, सर्व प्रभाग अधिकारी, सर्व विभाग प्रमुख,अधिकारी उपस्थित होते.

## अक्षरा ठाकूर, अविष्कार पाटीलचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश

**चिरनेर** : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षेत चिरनेर येथील पी. पी खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालयाची आठवीत शिकणारी विद्यार्थिनी अक्षरा जितेंद्र ठाकूर ही जनरल कॅटेगिरीमधून ९७ वी आली आहे. तर याच माध्यमिक शाळेचा विद्यार्थी अविष्कार बळीराम पाटील हा जनरल कॅटेगिरीमधून



१११ वा आला आहे. हे दोन्ही विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी चिरनेर शाळेचे एकूण दहा विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी दोन विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेचे संस्थापक पी.पी. खारपाटील, राजेंद्र खारपाटील, मुख्याध्यापक मिलिंद पट्टेबहादुर, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर, व्ही ए पाटील, भवर तसेच शाळेच्या सर्व शिक्षकांनी घेतलेल्या मेहनतीमुळे हे यश मिळाले आहे.



## वडाच्या झाडाला लावली आग

**अलिबाग** : अलिबाग रेवस मार्गावरील संभाजीवाडा येथे मंगळवार (दि.२२) जुलै रोजी रस्त्याच्याकडेला असलेल्या भल्या मोठ्या वडाच्या झाडाच्या बुंध्याला भरपावसात चार ते साडे चारच्या सुमारास अज्ञाताने ज्वलनशील पदार्थ टाकून आग लावली. झाडाला आग लावल्यामुळे हे झाड कोणत्याही क्षणी भररस्त्यात कोसळून अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. गेल्या काही वर्षांपासून या मार्गावरील रस्त्याच्या कडेला असलेली झाडे कोसळून वारंवार अपघात होत आहेत. याच मार्गावर भाल गावाजवळ काही महिन्यांपूर्वी लावलेले आगीत वडाचे झाड दुचाकीवर कोसळून अपघात होता-होता वाचला होता. याकडे संबंधित प्रशासनाने व सार्वजनिक बांधकाम विभागाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही वर्षांपासून याच मार्गावर रस्त्याच्याकडेला असलेली झाडे कोसळून वारंवार अपघात होत आहेत. अशा धोकादायक झाडांची पाहणी करून ती झाडे तोडून टाकावी अशी मागणी या मार्गाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी व वाहनचालकांनी केली आहे. तसेच अशी आग लावून निसर्गासोबतच मानवीय जीवितहानी व वित्तहानी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या समाजकंटकांवर कडक कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- पिक-अप ४०७, आयशट डंपर वरील ड्रायवर पाहिजे आहेत झिराड आणि मांडवा येथील सपंर्क : ८८०६६८३२३२ /८००७८९३२३२
- पांढरे डाग करा मुळापासून नष्ट : औषधामध्ये आहे याचा परिणाम या औषधाचा करा वापर पांढरे डागापासून मिळवा मुक्ती. संपर्क : ८९६९१३५३८९ यावर कॉल करा. घरीबसल्या औषध मिळवा.
- अलिबागमधील ऑफिसकरीता सिवील सुपरवायझर. civil engineer व ड्राफ्टसमन पाहिजे. मो.नं. ९९७०३९१६९७
- गोंधळपाडा येथील गृहप्रकल्पाकरीता अनुभवी सिव्हील इंजिनिअर/साईट सुपरवाइजर पाहिजेत. संपर्क- ९५९५०४१६१२/८१८०८६१२३४
- अंध दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या GSP INDIA या संस्थेला अलिबागमध्ये पद भरणे आहे. प्रकल्प समन्वयक शिक्षण पदवीधर/MSW मानधन (१२००० ते १५००० पात्रतेनुसार) सामाजिक संस्थेत काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य. आपला बायोडाटा ९०९६२१४२९४ या क्रमांकावर पाठवा. www.gspindia.org
- शर्ट कारागीर पाहिजे. नामांकित टेलरिंग दुकानात अनुभवी शर्ट कारागीर पाहिजे. संपर्क हिमसन टेलर, पेढांबे, अलिबाग मो. ९२६००९८९९२
- ऑफिसमध्ये अकाऊंटचा कामासाठी मुलगी पाहिजे. महाराष्ट्र जनरल स्टोअर्स अलिबाग ९७६५०५०२६३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# अलिबागमध्ये मटण खरेदी फक्त ५० टक्के

## विक्रेत्यांचे बहुतेक माल शिल्लक

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**गटारी अमावस्या दरवर्षी श्रावण सुरू होण्याच्या आदल्या दिवशी साजरी केली जाते. या दिवशी भरपूर प्रमाणात मांसाहार केला जातो. श्रावण सुरु होण्यापूर्वी सगळ्यांच्या खासकरून मांसाहरीप्रेमींच्या आवडीचा सण म्हणेज गटारी अमावस्या. या दिवशी बहुतांश लोकांच्या घरी वेगवेगळ्या प्रकारचे मांसाहरी पदार्थ बनवले जातात. पण खूप कमी जणांना माहित आहे की गटारी अमावस्येचं मूळ नाव गटारी नाही, तर गतहारी अमावस्या आहे. गटारी अमावस्यागटारी म्हटले की अनेकांच्या डोळ्यांसमोर मजा, मस्ती, भरपूर मांसाहार आणि मद्यपानाचे चित्र उभे राहते.**



श्रावण महिन्याला शुक्रवारपासून सुरूवात होत आहे. त्यामुळे बुधवारी अलिबागसह जिल्ह्यातील अनेक भागात गटारी सण साजरा करण्यात आला. मटण खरेदीसाठी ग्राहकांची प्रचंड गर्दी होती. मात्र, मटणाची मागणी कमी असल्याने यावर्षी फक्त ५० टक्केच खरेदी झाली. खरेदीला प्रतिसाद कमी मिळाल्याने सुमारे ३५ टक्के माल शिल्लक राहिल्याचे मटण विक्रेत्यांकडून सांगण्यात आले आहे.

श्रावण महिन्यास शुक्रवार (दि.२५) पासून सुरू होणार आहे. त्यामुळे बुधवार (दि.२३) अलिबागसह संपूर्ण जिल्ह्यात मांसाहार खाण्यावर भर देण्यात आला. सकाळी पाच वाजल्यापासून मटण विक्रेत्यांच्या दुकानात मटण खरेदीसाठी गर्दी झाली होती. सकाळी दहा वाजेपर्यंत दुकानांमध्ये रांगाच रांग होती. पिव्हर मटण ८०० रुपये व मिक्स मटण ७२० रुपये किलो दराने मटण विकण्यात आले. मटण खरेदीला गर्दी असली, तरीदेखील यावर्षी खरेदी फारसी झाली नसल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. अलिबाग तालुक्यात ५० हून अधिक मटण विक्रीची दूकाने आहेत. या दुकानांमध्ये एक हजारहून अधिक बोकडांची कत्तल होणे अपेक्षीत होते. परंतु ४५० बोकडांची कत्तल झाली. यावरून ग्राहकांकडून मागणी कमी झाल्याचे दिसून आले आहे. वाढती महागाई, चालू असलेली भात लावणीची कामे आसल्यामुळे गटारीला यावर्षी प्रतिसाद कमी मिळाल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.

### वाटा पद्धतीचा विक्रेत्यांना फटका

जिल्हयातील अनेक गावांमध्ये बोकड बाळगण्याचा व्यवसाय जोरात सुरू आहे. गावांतील बेरोजगार तरुण गावठी बोकड बाळगून त्यांची बाजारात विक्री करतात, त्यामुळे गावात बाळगल्या जाणाऱ्या बोकडांना प्रचंड मागणी वाढली. गावातच बोकट कापले जात असल्याने दुकानात प्रतिसाद कमी झाला. गावांमधील वाटा पध्दतीचा मटण विक्रेत्यांना फटका बसल्याचे सांगण्यात आले आहे.

> यावर्षी ग्राहकांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. फक्त ५० टक्केच बोकडांची कटाई करण्यात आली आहे. एक हजारहून अधिक बोकडांची कटाई होणे अपेक्षीत होते. यावर्षी अर्धा, पाऊस व एक किलो प्रमाणे मटण खरेदी करण्यात आला. त्यामुळे खरेदी कमी झाली आहे.
>
> – महेंद्र नखाते
> अध्यक्ष अलिबाग तालुका बकरे मटण खाटीक संघटना

# तळा ग्रामीण रुग्णालय विविध समस्यांच्या गर्तेत

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा शहरवासीयांच्या सेवेत नव्याने दाखल झालेल्या ग्रामीण रुग्णालयामुळे शहरवासीयांना आरोग्याच्या दृष्टीने काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी या ग्रामीण रुग्णालयाला विविध समस्यांनी ग्रासले असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. तळा शहरातील ग्रामीण रुग्णालय सुरू झाले खरे परंतु, या रुग्णालयाचे अंतर नागरिकांना बऱ्याच लांबचे पडत असल्यामुळे नागरिकांसमोर मोठी समस्या निर्माण झाली आहे. मोफत औषधोपचार असतानाही एखाद्या रुग्णाला उपचार घेण्यासाठी जायचे झाल्यास केवल रुग्णालयाचे अंतर लांबचे असल्याने रिक्षाला शंभर रुपये भाडे मोजून जावे लागते. त्यामुळे बरेचशे रुग्ण ग्रामीण रुग्णालयाकडे पाठ फिरवून खासगी दवाखान्यात जाणे पसंत करतात. तसेच गोरगरीब रुग्ण आर्थिकस्थिती चांगली नसल्याने नाईलाजाने चालत





अंतर पार करून रुग्णालय गाठतात. अशातच रुग्णालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर पथदिवे नसल्याने रात्रीच्या वेळी या ठिकाणी गडद अंधार पसरलेला असतो. त्यामुळे आपसूकच सहजासहजी एखादी व्यक्ती रात्रीच्या वेळी रस्त्यावरून उपचार घेण्यासाठी धजावत नाही. रुणालयाच्या मागील बाजूस पावसामुळे वाढलेल्या गवत व झाडीमुळे रुग्णालय समोरील भागात जनावरांचा वावर असून येथील कर्मचाऱ्यांना रात्रीच्या वेळी मुख्य दरवाजा बंद करून घ्यावा लागतो. तसेच रुग्णालय सुरू झाल्यापासून या ठिकाणी पाण्याची व्यवस्था करण्यात आली नसल्याने येथील कर्मचाऱ्यांना पिण्यासाठी विकतचे पाणी आणावे लागते. अशा विविध समस्यांच्या गर्तेत ग्रामीण रुग्णालय अडकले असून प्रशासनाकडून या ठिकाणी रस्त्यावर पथदिवे बसविणे,वाढलेली झाडे, गवत कापणे, कर्मचाऱ्यांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, रुग्णालयाकडे जाण्यायेण्यासाठी नागरिकांना स्वस्त दरात प्रवास कसा उपलब्ध करता येईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जेणेकरून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांसह नागरिकांची होणाऱ्या त्रासापासून सुटका होईल.

## ज्येष्ठ नागरिकाला ३१ लाखाला गंडा

**पनवेल** : केंद्र सरकारच्या अर्थ खात्याच्या योजनेत गुंतवणूक केल्यास ७ ते ८ महिन्यात जास्तीचे व्याज मिळेल, बतावणी करुन तक्का येथील उच्च शिक्षित निवृत्त अधिकाऱ्याची ३१ लाख ७५ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी तक्रारदार यांनी नॅशनल सायबर सेल पोर्टलवर तक्रार केली होती. पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदला आहे. केंद्र सरकारच्या अर्थ खात्याच्या नावाने पेमेंट ऑफ डिव्हीडंड अ‍ॅन्ड डिपॉझिट कॉन्फरमेशन योजनेत आर्थिक गुंतवणूक केल्यास बँकांपेक्षा जास्त व्याज दर मिळू शकतो, अशी बतावणी करत आपण, केंद्र सरकारचे कर्मचारी असल्याची थापही त्यांनी ठोकली. त्यांच्यावर विश्वास ठेवत मृदुल भट्टाचार्य यांना वारंवार फोनवरून संपर्क साधत फोन पेद्वारे वेगवेगळ्या वेळी तब्बल ३१ लाख ७५ हजार ५२७ रुपयांस जैस्वाल यांना गंडविण्यात आले आहे.



## चिकन-मटणाच्या दुकानाबाहेर रांगा

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

आषाढ महिन्याचे शेवटचे दिवस शिल्लक आहेत. त्यामुळे आज गटारीच्या नावाने ओळखली जाणारी आषाढी अमावास्या साजरी केली जात आहे. गटारी अमावस्या हा मराठी संस्कृतीतील एक खास आणि मजेदार सण आहे, जो आषाढ महिन्यातील अमावस्येला साजरा केला जातो.

आषाढ महिना संपल्यानंतर श्रावण महिना सुरू होतो. त्यामुळे अनेकजण गटारी अमावस्या झाल्यानंतर श्रावण महिन्यात मासांहार वर्ज करतात. त्यामुळेच बुधवारी रोहा तालुक्यात नागोठणे, वाकण, सुकेळी, खांब, कोलाड परिसरात देखिल गटारी साजरी करण्यासाठी सकाळपासूनच चिकन, मटणांच्या दुकानांच्या बाहेर रांगा लागल्याचे चित्र पहावयास मिळत होते.

गटारीचा बुधवारचा योग साधुन आल्यामुळे सर्वत्र गटारी जोरात साजरी करण्यात आली. गटारी असल्याने मटण, चिकन तसेच मद्यांच्या दुकानात देखील ग्राहकांची गर्दी पहावयास मिळत होती. तसेच गावागावांमध्ये एकत्रित बोकड कापून नागरीकांनी आपले मटणाचे वाटे घरी नेले तर काही ठिकाणी मटणाचे पोस्तदेखील करण्यात आले होते.



## महेंद्र पाटील याच्या कुटुंबियांना अर्थसहाय्य

**। उरण । प्रतिनिधी ।**

महावितरण कंपनीत कंत्राटी कामगार म्हणून काम करणारे चिरनेर गावातीलकामगारमहेंद्ररामचंद्रपाटील या कामगाराचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची घटना नूकताच घडली होती. या कामगाराच्या कुटुंबियास महावितरण कंपनी उरण, कामगार संघटनेच्या माध्यमातून महावितरण कंपनी उरणचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विकास गायकवाड यांच्या हस्ते आर्थिक मदत देण्यात आली.

महावितरण कंपनी उरणच्या अंतर्गत येणाऱ्या चिरनेर, जासई, कोप्रोली येथील महावितरण कार्यालयात महेंद्र हा कंत्राटी कामगार गेली अनेक वर्षे कामगार म्हणून काम करत होता. चिरनेर, रानसई परिसरातील खंडित झालेला विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी हा कामगार काम करत असताना येथे विजेच्या धक्याने त्याचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन लहान मुले, वयोवृद्ध वडील असा परिवार आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अंत्यत हलाखीची असल्याने त्यांच्या कुटुंबीयांना महावितरण कंपनीने आर्थिक सहाय्य करून अपेक्षा महेंद्र पाटील या पत्नीला नोकरीत सामावून घेण्यात यावे अशी मागणी संतोष ठाकूर यांनी महावितरण कंपनीकडे केली होती. याप्रसंगी समीर डुंगीकर, विरेंद्र पाटील, महेश जाधव, चव्हाण, शशिकांत म्हात्रे, बी सी ठाकूर, मंगेश भोईर, राजकुमार हिली, कमाल खान, रोहन गायकवाड, दत्तात्रेय मोकल सह ग्रामस्थ, कुटुंब उपस्थित होते.

# आदिवासी महिलांच्या माध्यमातून रानभाजी महोत्सव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पोशीर ग्रामपंचायतमधील चिंचवाडी या आदिवासी ठाकूर समाजाची लोकवस्ती असलेल्या वाडीमध्ये रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दरवर्षी आयोजित होणाऱ्या रानभाजी महोत्सव हा केवळ चविष्ट पदार्थांचा उत्सव नाही, तर तो आदिवासी जीवनपद्धती, जैवविविधता, आणि पारंपरिक ज्ञान यांचा जिवंत अनुभव देणारा सांस्कृतिक उपक्रम आहे. कॅम्पर शेफ ही यश सप्रे आणि मेघा जैन यांची टीम गेली चार-पाच



वर्षे चिंचवाडी परिसरात शिक्षण, पोषण, आणि उपजीविकेच्या विविध उपक्रमांवर कार्यरत आहे.

या रानभाज्या महोत्सवचे नियोजन सहकार्य स्प्राऊट्स, एट जनरेशन (ध्रुव), आणि साध फाउंडेशन यांनी केले होते. सीड्स ऑफ बनियन संस्था देखील प्रचार कामात सहभागी आहे.

रानभाज्या महोत्सवात कुरडू, टाकळा, शेवाळ, फोडशी, कंद, काकड फळ, बोण्डारा पान, आमसूल, चिंच यांसारख्या पारंपरिक रान भाज्या प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. कोंकणी रान माणूस प्रसाद गावडे तसेच पर्यावरणतज्ञ आनंद पेंढारकर, भारत मनसाटा यांनी महिलांना मार्गदर्शन केले.

## रोडपालीत किराणा दुकानाला आग

**पनवेल** : रोडपाली परिसरात पाटील डेअरी या किराणा मालाच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत संपूर्ण दुकान जळून खाक झाले आहे. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

## कामोठ्यात मुख्याध्यापकांची सविचार सभा

**। उरण । प्रतिनिधी ।**

नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी व शाखाप्रमुख भूमिका या विषयावर रायगड विभागीय कार्यशाळा रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभाग प्राचार्य व मुख्याध्यापक कार्यशाळा सोमवार (दि. २१) रोजी रायगड विभागीय चेअरमन माजी आ. बाळाराम पाटील यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली.

सदर कार्यशाळेसाठी सातारा येथून माहिती अधिकारी व नवीन शैक्षणिक धोरण तज्ञ शिवाजी राऊत यांनी नवीन शैक्षणिक धोरण व माहिती अधिकार या वर दोन सत्रात प्रभावी मार्गदर्शन करून प्रशासकांना भेडसावणाऱ्या अडचणींचे निराकरण केले. रयत शिक्षण संस्थेचे कायदा अधिकारी विनोद गोडगे यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी कोळी, महेश पाटील, आमोद ठक्कर व विभागातील आश्रम शाळांचे माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. डी सी पाटील यांनी सूत्रसंचालन तर सहाय्यक विभागीय अधिकारी जगताप यांनी आभार मानले.

## शिस्तीसाठी, अपघात रोखण्यासाठी बडगा | कोंडी सोडवण्याकडे लक्ष देण्याची मागणी

# खारघरमध्ये चालकांवर कारवाई

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

**वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर खारघर वाहतूक शाखेने कारवाईचा बडगा उगारला आहे. १ ते २० जुलै या अवघ्या २० दिवसांत तीन हजार बेशिस्त वाहनचालकांकडून हजारोंचा दंड वसूल केला आहे, तर गेल्या १० महिन्यांत १० लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे.**



खारघर लोकसंख्येबरोबरच शहरात वाहनांची संख्याही वाढली आहे. वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी तसेच अपघात रोखण्यासाठी खारघर वाहतूक शाखेने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. यात १ जानेवारी ते २५ एप्रिल दरम्यान राबवण्यात आलेल्या मोहिमेत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १२ हजार वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करून १० लाख ४८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला होते. गेल्या २० दिवसांत वाहन चालविताना मोबाईल फोनवर बोलणे, सिग्नल तोडणे, दुचाकीवरून तिघांनी प्रवास करणे, विनाहेल्मेट, सुरक्षा बेल्ट परिधान न करणे तसेच मुख्य रस्ते, चौकात वाहने उभी करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणे अशा तीन हजार बेशिस्त चालकांवर कारवाई करत हजारो रुपयांचा दंड वसूल केला आहे. दंडवसुली करताना कोंडी सोडवण्याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### रिक्षाचालकांच्या मनमानीला लगाम

खारघर परिसरात तीन हजारांहून अधिक रिक्षा धावतात. दरम्यान, खारघर रेल्वेस्थानकावर बेशिस्तपणे रिक्षा उभी करून प्रवाशांना अडथळा निर्माण करणे, त्यांच्याशी वाद घालणे आदी प्रकाराला आळा घालण्यासाठी खारघर वाहतूक पोलिसांनी कारवाई केली. त्यामुळे रिक्षाचालकांच्या मनमानीला लगाम बसला आहे.

> काही वर्षात परिसरातील अपघातांच्या घटना वाढल्या आहेत. खारघरच्या वाढत्या लोकसंख्येत वाहनांचीही भर पडत आहे. चालकांनी नियमांचे पालन करून सहकार्य करावे.
>
> – तिरुपती काकडे, उपायुक्त , वाहतूक विभाग

## महाविद्यालयात मार्गदर्शन

**पनवेल** : पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल हद्दीतील विविध शाळा व महाविद्यालयात सायबार सेल संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी सायबर सेलच्या माध्यमातून कोणालाही ओटीपी नंबर देऊ नये, अनोळखी लिंक ओपन करू नयेत, सोसलमीडियाचा कमीत कमी वापर करावा, कुठल्याही आमिषाला बळी पडू नये, अनोळखी इसमांना तसेच सोशल मीडियावर फॉलो करू नये, अनोळखी फोन तसेच इसमांना आपली वैयक्तिक माहिती, आधारकार्ड, पॅनकार्ड देऊ नये असे मार्गर्दर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थिनींना गुड-टच, बॅड-टच संदर्भात माहिती देण्यात आली.



# शैक्षणिक नवोपक्रम पुस्तिकेचे प्रकाशन

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद केंद्र वैजनाथ येथे मंगळवार (दि.२२) रोजी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न झाली. या परिषदेत शिक्षण विस्तार अधिकारी नारायण सोनवणे यांनी आपल्या संकल्पनेतून कर्जत तालुकास्तरीय शैक्षणिक नवोपक्रम पुस्तिका निर्मिती केली. सदर पुस्तिकेचे प्रकाशन सोमवार दि.२१ रोजी कर्जत तालुक्याचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांच्या हस्ते सदर पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले होते.

यावेळी पुस्तिका गट शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यवरांच्या उपस्थितीत सुपूर्द करण्यात आली. पुस्तिका निर्मितीसाठी नितीन थोरात, संजय थोरात, नरेंद्र साळुंके यांनी सहकार्य केले. सदर पुस्तिकेसाठी शिक्षण विभाग कर्जत, गट साधन केंद्र कर्जत, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख कर्जत यांनी मार्गदर्शन केले होते.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी जाधव, पारधी, म्हात्रे, केंद्रप्रमुख पाटील, जुईकर, सोनावळे, पाटील, मोरे, बिभीषण नवले, सविता बोराडे, केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातील परिषदेचे सूत्रसंचलन अशोक सहाणे यांनी केले होते.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेशपब्लिशर्सप्रा.लि.कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप यांच्या विद्यमाने समाजातील इयत्ता दहावी व बारावीच्या परिक्षेत ६५ टक्के पेक्षा अधिक गुण संपादन करून उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव रविवार (दि.२७) जुलै रोजी सकाळी ११ वाजता कुणबी भवन हॉल माणगाव येथे तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या हस्ते व साले ग्रुपचे अध्यक्ष भागोजीबुवा डवले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच कुणबी समाज साले ग्रुपचे सल्लागार प्रभाकर उभारे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

## गामपंचायत भरडखोल
### ता. श्रीवर्धन, जि. रायगड

दिनांक : २३/०७/२०२५

**जाहीर निविदा**

ग्रामपंचायत भरडखोल, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांजकडून १५वा वित्त आयोग सन २०२४-२५ अंतर्गत खालील कामासाठी ठेकेदार नेमण्यासाठी नोंदणीकृत संस्था/नोंदणीकृत ठेकेदार/ सु.बे. अभियंता यांचेकडून जाहिर निविदा खालील प्रमाणे :-

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा सादर करण्याचा दिनांक | निवीदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुणबीवाडी येथे पाण्याचा ओटा (धोबीघाट) सुशोभिकरण करणे | २,००,०००/- | ६ महिने | दिनांक २४/०७/२०२५ ते ०१/०८/२०२५ पर्यत | दि ०२/०८/२०२५ |
| २ | कार्ले विहीर येथे चेंबर शुध्दीकरण करणे | २,९२,०००/- | ६ महिने | | |

**अटी व शर्ती :-**

१. निविदा संबंधित सविस्तर माहिती ग्रा.पं. कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहायला मिळेल.
२. निविदा कार्यालयीन वेळेत मा. सरपंच सो. यांच्या नावे ग्रा.पं. कार्यालयाकडे सादर कराव्यात.
३. अपूर्ण व उशिरा पोहचलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.
४. निविदेसोबत इसारा रक्कमेची रोखीची पावती जोडलेली असावी.
५. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं.राखून ठेवत आहे.
६. नोंदणीकृत ठेकेदार व कामाचा अनुभव असलेले ठेकेदार पात्र राहील व जीएसटी धारक असावेत.
७. नोंदणीकृत ठेकेदाराने विहीत मुदतीत काम पूर्ण न केलेस सदर कामाचा ठेका रद्द करणेत येईल.
८. निविदा मंजूर झालेनंतर १००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा स्वखर्चाने करुन द्यावा.
९. निविदा नामंजूर केलेल्या ठेकेदारांना कोणत्याही प्रकारचा लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही.
१०. शासकीय नियमानुसार शासकीय कपात करुन अंतिम बिल दिले जाईल.

**सरपंच**
**ग्रामपंचायत भरडखोल**
**ता. श्रीवर्धन, जि. रायगड.**

**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत भरडखोल**
**ता. श्रीवर्धन, जि. रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. धर्मा नारायण जोगडे व १ दोघे ही रा. ढोकशेत, सुधागड, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - ढोकशेत, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १८२ | ०-४६-१० | २.२४ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २४/०७/२०२५ सही/-

**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली मिळकत सदर मिळकतीचे विदयमान मालकांकडून विकत घेण्याची बोलणी सुरू केली आहेत. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विदयमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| विद्यमान मालकांचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| चकोर लालचंद दोशी<br>चंपा चकोर दोशी<br>चिराग चकोर दोशी | २८८ | २-१२-० | ३-७७ |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा-वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचे खरेदी व्यवहाराची बोलणी पुर्ण करुन खरेदीखत पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २४/०७/२०२५

**ॲड. रविंद्र वि. ओक**
''गुरूकृपा'',
अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड, मु.पो.ता. अलिबाग,जि.रायगड.

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात-९/आवक क्र. ४२५/२०२५

श्री. ठकु बाबु शिद
रा. पत्र्याची ठाकुरवाडी पो. हातोंड — वादी
ता. सुधागड, जि. रायगड
ग्रामसेवक, ग्रामपंचायत - दहिगाव
ता. सुधागड, जि. रायगड — प्रतिवादी

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे**
**जन्म - मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसद्वारे कळविणेत येते की, श्री, ठकु बाबु शिद रा. पत्र्याची ठाकुरवाडी पो. हातोंड ता. सुधागड, जि. रायगड यांनी माझा मुलगा कु. रहिन ठकु शिद याची जन्म दि. १९/११/१९९९ रोजी मौजे पत्र्याची ठाकुरवाडी पो. हातोंड ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्याची जन्म नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदर कु. रहिन ठकु शिद त्याच्या जन्म नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे जन्म नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड सही/-
दिनांक :- २३/०७/२०२५

**उत्तम कुंभार**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक साक्षी भूषण कवटे, रा. रुम नं. १४, कवटे चाळ, आगरा रोड, रामदेव हॉटेल जवळ, वेताळवाडी, कल्याण (पश्चिम), कल्याण - ४२१०३०१ यांच्या खुद्द मालकीची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ. मी. ) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| वरसोली ता. अलिबाग | १६६/१९०/१९६/१९७/ १९८/८४ | ४-५०-०० | ४५.०० |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २३/०७/२०२५ सही/-

**ॲड. विवेक रमेश साळवी**
शॉप नं. ५, दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्रीमती जीवनलता नंदकिशोर कागलीवाल (''सदरहू मालक'') यांनी त्यांच्या मालकीची खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन (''सदरहू शेतजमीन) आमच्या अशिलांना विकण्याचे मान्य केले आहे. त्यानुसार आमच्या अशिलांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे आम्ही सदरहू जमिनीच्या नामाधिकारांची तपासणी करीत आहोत.

सदरहू शेतजमिनीमध्ये किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये कोणाही व्यक्तीचा हक्क, नामाधिकार हिस्सा, हितसंबंध अधिकार वा दावा-जसे की विक्री, हस्तांतर, अभिहस्तांतरण, गहाण ताबा धारणाधिकार, भाडेपट्टा, विश्वस्तव्यवस्था, भेट, हक्क, वारसा, देखभाल, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, वहिवाटीचा हक्क, कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हुकूम किंवा कोणत्याही प्रकारचा करारनामा वा अन्य कोणत्याही प्रकारे, असल्यास निम्नस्वाक्षरीकरांना त्यांच्या खालील नमूद पत्त्यावर दाव्यांच्या पृष्टर्थ्य दस्तऐवजी पुराव्यांसह सदरहू जाहीर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीमध्ये कळविणे आवश्यक आहे. अन्यथा सदरहू शेतजमिनीमध्ये सदरहू मालक वगळता अन्य कोणाही व्यक्तींचा कोणत्याही प्रकारचा हक्क, नामाधिकार, हितसंबंध अथवा दावा नाही किंवा त्यांचा त्याग केल्याचे/सोडून दिल्याचे समजण्यात येईल.

**शेतजमिनीचे परिशिष्ट**

तुकडी जिल्हा रायगड, पोट तुकडी तालुका कर्जत, दुय्यम निबंधक कर्जत, मांडवणे ग्रामपंचायत हद्दीतील मांडवणे, सर्व्हे क्रमांक २०, हिस्सा क्रमांक ५ क्षेत्रफळ ४ हे -०७ आर-०० प्रति आकार १ रु ७९ पैसे पैकी विकत देण्यात येणारे क्षेत्र ० हे-५० आर-०० प्रति, भोगवटादार वर्ग क्रमांक १ ची जमीन मिळकत.

**सदरहू शेतजमिनीच्या चतुः सिमा खालीलप्रमाणे**

पूर्वेस -वन सर्वेक्षण क्रमांक असलेला भूखंड.
पश्चिमेस - नियुक्त प्लॉट क्रमांक ११८ सर्व्हे क्रमांक २०/५ सह ६ मीटर रुंदीचा रास्ता असलेला भूखंड.
उत्तरेस - नियुक्त प्लॉट क्रमांक १२० सर्व्हे क्रमांक २०/५ असलेला भूखंड.
दक्षिणेस - सर्वे क्रमांक २०/६ असलेला भूखंड.

दिनांक २४ जुलै,२०२५
कदम आणि कंपनी
वकील
३०५-३०६, ३रा माळा, युसूफ बिल्डींग,
महात्मा गांधी रोड,
फोर्ट, मुंबई ४०० ००१.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री. निखिल देवेंद्रनाथ वैदय यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे वावळोली, तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं व उपविभाग/सर्व्हे नं/ हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| श्री. निखिल देवेंद्रनाथ वैदय | १४/१अ | ०-६०-२० पैकी ०-१६-०० | २-८० |

या मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणा-पावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. २४/०७/२०२५ खरेदीदारातर्फे वकील
ॲड वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ॲड निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता-शॉप नं २९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा
बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड.
कर्जत ता कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## तहसिल कार्यालय सुधागड यांचे न्यायालयात

क्र. फौजदारी/कात -९/आवक क्र.३८०/२०२५

श्रीम. ज्योतीका भिकाजी बामगुडे
रा. दिघेवाडी — वादी
ता. सुधागड, जि. रायगड
ग्रामसेवक, ग्रामपंचायत - नांदगाव — प्रतिवादी
ता. सुधागड, जि. रायगड

**जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे**
**जन्म-मृत्युबाबत**

तमाम जनतेस या जाहिर नोटीसव्दारे कळविणेत येते की, श्रीम. ज्योतीका भिकाजी बामगुडे रा. दिघेवाडी, ता. सुधागड, जि. रायगड यांनी कै. लक्ष्मीबाई लक्ष्मण बामगुडे यांचा मृत्यु दि. १४/११/२०२१ रोजी मौजे - दिघेवाडी ता. सुधागड, जि. रायगड येथे झाला आहे. परंतु त्याची नोंद अद्यापपर्यत ग्रामपंचायत कार्यालयात केली नाही असे प्रतिज्ञापत्रात नमुद करुन त्यांच्या मृत्यु नोंदीचा आदेश मिळणेबाबत अर्ज तहसिल कार्यालय सुधागड येथे सादर केला आहे.

सदरहू कै. लक्ष्मीबाई लक्ष्मण बामगुडे यांच्या मृत्यु नोंदीच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय, सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरुपात हरकत दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल. असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

ठिकाण :- सुधागड पाली सही/-
दिनांक : २३/०७/२०२५

**उत्तम कुंभार**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या जमिन मिळकतीचे मालक श्री. राजन दौलत गिरी वगैरे ७ यांच्याकडुन सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| वाघोलीवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड | ५० | ०-०४-०० | ०.११ |

सदर जमिन मिळकत ही या नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील जमिन मिळकतीबाबत कुणाचेही ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन पंधरा दिवसांचे आत खाली सही करणार याचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात. सदर मुदतीत हरकती न आल्यास वरील जमिन मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे, असे समजुन इतर कोणाचाही कायदेशीर हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक आमच्या अशिलांच्या हक्कात सोडून दिलेले आहे, असे समजून व कायदेशीर बाबींची पूर्तता करून माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत, तक्रार माझे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २३/०७/२०२५

**ॲड. प्रतिक्षा रा. परबळकर**
०५, श्रुती सारंग सहकारी सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सूचित करण्यात येत आहे की, **मौजे नानामस्तर नगर, मुद्रे (बु.), ता. कर्जत, जि. रायगड** येथील खालील वर्णनाची मिळकत **सर्व्हे नं. १२, हिस्सा नं. २अ, प्लॉट नं. ८ व ९** चे मालक **कीर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, मुद्रे (बु.), ता. कर्जत, जि. रायगडची** मालमत्ता विकसित करण्याकरिता जाहीर नोटीस.

**नानामस्तर नगर, मुद्रे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती मिळकत.**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| कीर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित | १२ | ८ व ९ | ५९७.५८ | |

सदरची बिनशेती मिळकत कीर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांनी पूर्णविकसित करावयाचे ठरविले आहे. सदर सोसायटीची पूर्नबांधणीसाठीची सर्वसाधारण सभा दिनांक १२ जुलै २०२५ रोजी झालेली आहे. तरी सदर बिनशेती मिळकतीच्या पुर्नविकासासाठी कीर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित यांजकडून नामांकित बिल्डर आणि डेव्हलपर्स यांच्याकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी सर्व बांधकाम व्यवसायिकांनी त्यांचे प्रस्ताव ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत संस्थेच्या कार्यालयात सादर करावे.

दिनांक: २३/०७/२०२५

**सचिव अध्यक्ष**
**कीर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित**
**मुद्रे (बु.), ता. कर्जत, जि. रायगड**

दिनांक :- २३/०७/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे - धोंडसे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोंडसे ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री. श्रीकांत कृष्णाजी सरनाईक वै २८ | २४ | ३ | १-४२-०० | ०-५० |
| | ५७ | ४ | ०-२९-३० | ५-०३ |
| | २४ | २ | ०-३२-०० | ०-०९ |
| | २२ | | १-४९-७० | ६-१९ |
| | ८/१० अ | | ०-८६-०० | ०-५० |
| | ८ | १६ | ०-०६-०० | ०-०४ |
| | २३ | ५ | ०-८७-५० | १०-१९ |
| | २३ | ८ | ०-०२-५० | ०-२५ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी, वहिवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध, वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विकी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड सही/-
दिनांक : २४/०७/२०२५

**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री.विजय पुंडलिक विद्रे रा.बी२/१०, रूम नं. १९, बॅक ऑफ इंडिया जवळ, सेक्टर नं. १५ नवी मुंबई, वाशी, वाशी, ठाणे यांचे मालकीची जमिन मी उषा नायर स्वतः कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| कुरनाड | विजय पुंडलिक विद्रे | ४६ | १.४५.४० | १.५२ |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी ०.२०.०० गुंठे एवढी मिळकत ही मी स्वतः कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेत आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतील कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंधन असल्यास ही नोटिस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ (सात) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण सही/-
दि.२३-०७-२०२५

**उषा नायर**
फ्लॅट नं.४०१ सनसिटी रेसीडेन्सी प्लॉट नं ई-८७/ई-८७ ए,
सेक्टर नं ०३ बेलपाडा खारघर नवी मुंबई,
एमएच खारघर,रायगड-४००२१०
मो.९०११९२५३७६

अर्जदारतर्फे ॲड. मृणाल सुरेश खोत

## जाहीर नोटीस

श्रीवर्धन येथिल मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात
ने. ता. २४/०७/२०२५ दि. चौ. अर्ज क्र. २८/२०२५
नि.क्र. ०८/ड

श्री जयेश जगन्नाथ अंबाजी,
वय ३१ वर्षे, धंदा - नोकरी,
रा. मु. पो. दिघी कोळीवाडा, — अर्जदार
ता. श्रीवर्धन, जि. रायगड ४०२४०२.
विरुध्द
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यांत येते की,

१) अर्जदार यांची आई कै. चंद्रप्रभा जगन्नाथ अंबाजी हे दिनांक १०/१०/२०२२ रोजी मौजे निरामय हॉस्पिटल खारघर येथे मयत झाल्या असून त्यांचे सर्व अंत्यसंस्कार हे मौजे दिघी, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे करणेंत आले. तसेच अर्जदार यांचे वडील कै. जगन्नाथ नाग्या अंबाजी हे दिनांक ०७/०८/२०२४ रोजी मौजे दिघी येथे राहत्या घरी मयत झाले असून सर्व अंत्यसंस्कार हे मौजे दिघी, येथे करणेंत आले.

कै. चंद्रप्रभा जगन्नाथ अंबाजी व कै. जगन्नाथ नाग्या अंबाजी यांचे पश्चात त्यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत.

२) अर्जदार यांना शासकीय/निमशासकीय व खाजगी कामाकरीता कायदेशिर वारस असल्याबाबतच्या वारस दाखल्याची आवश्यकता आहे.

३) कै. चंद्रप्रभा जगन्नाथ अंबाजी व कै. जगन्नाथ नाग्या अंबाजी हे मयत झाले असल्यामुळे अर्जदार यांस त्याचे कायदेशिर वारस म्हणून अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी सदर अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

तरी या बाबत कोणचीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या में. न्यायालयात समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येइल व त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख १२/०६/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिध्द केली.

**सही/-**
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर श्रीवर्धन**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर श्रीवर्धन**

## इशारा सूचना

**ज्या कोणाशी संबंधित असेल**

कृपया नोंद घ्यावी की, १ए) चंद्रभागा आत्माराम पाटील, १ बी) सुनील आत्माराम पाटील, १ सी) सविता विजय शिंगरूट, १डी) सीमा आत्माराम पाटील, १ई) सुरेखा महेश गावंड, १एफ) सुषमा नीलेश पाटील (अ. क्र. १ए ते १एफ हे आत्माराम महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस), २ए) छाया अशोक पाटील, २बी) उदय अशोक पाटील, २सी) सानिका शैलेश घरत, २डी) मानसी मनोज लवाटे (अ. क्र. २ए ते २ डी हे दत्ताराम/दत्तात्रय महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस, ३ए) ताराबाई शांताराम पाटील, ३बी) विजय शांताराम पाटील, ३सी) संजय शांताराम पाटील, ३डी) शशिकला विनायक गावंड, ३ई) वंदना सतीश म्हात्रे (अ. क्र ३ए ते ३ई हे शांताराम महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस, ४ए) सुरेश शंकर पाटील, ४बी) नरेश शंकर पाटील, ४सी) संदेश शंकर पाटील, ४डी१) रेखा शिरीष पाटील, ४ डी२) श्रुती शिरीष पाटील, ४डी ३) प्रतीक शिरीष पाटील (अ. क्र ४डी १ ते ४ डी ३ हे शिरीष शंकर पाटील यांचे कायदेशीर वारस, ४ई) ललिता दत्तात्रय मोकल, ४एफ) वनीता गजानन म्हात्रे, ४जी) सुनीता बिपीन ठाकूर, ४ एच) नीता राजेंद्र माने, ४आय) गीता शंकर मोरे (अ. क्र. ४ए ते ४ आय हे शंकर महादेव पाटील यांचे कायदेशीर वारस) (यापुढे एकत्रितरीत्या मालक म्हणून उल्लेखित) यांनी खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत जमिनीचे माझ्या अशिलांच्या नावे विक्री, हस्तांतरण व अभिहस्तांकन करण्याचे मान्य केले आहे.

मालकांनी माझ्या अशिलांसमवेत वैध, बंधनकारक व प्रचलित करार केला आहे व त्यांनी माझ्या अशिलांच्या खालील निर्देशित जमिनीची विक्री व हस्तांतरणाच्या मूल्याच्या अंशतः प्रदानाचीही प्राप्ती केलेली आहे.

सर्वसामान्य जनतेस त्यामुळे इशारा देण्यात येत आहे की, कोणीही खालील निर्देशित जमीन वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात मालकांसमवेत कोणताही व्यवहार करू नये वा कोणताही करार करू नये व तरीही एखाद्या व्यक्तीने खालील निर्देशित जमिनीसंदर्भात मालकांसमवेत कोणताही व्यवहार केलेला असल्यास तो माझ्या अशिलांवर बंधनकारक नसेल व असा व्यवहार अर्थहीन व बोगस समजण्यात येईल तसेच कोणीही व्यक्ती असा करार करीत असल्यास तो त्यांच्या स्वतःच्या खर्च, जबाबदारी व जोखमीवर असेल.

**वरील संदर्भित अनुसूची**

पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड-गाव नारंगी, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील व ग्रामपंचायत नारंगी हद्दीतील, नोंदणीकरण उपजिल्हा अलिबाग व नोंदणीकरण जिल्हा रायगड येथील व खालील विवरणीत सर्व्हे क्रमांकानुसार :

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र | निर्धारण (रु.- पै) | क्षेत्र हे.आर-चौ.मी. | | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|
| ४९ | १एफ | ९-३६ | पिकयोग्य क्षेत्र | ०-३०-३० | ३,०३० |
| | | | पोटखराबा | ०-१०-३० | १,०३० |
| | | | एकूण | ०-४०-६० | ४,०६० |

अर्थात मोजमापित **०.४०.६० हेक्टर-आर-चौ.मी. अर्थात ४०६० चौ.मी. वा जवळपास,** हक्क नोंदींनुसार व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : सेलिनी सिन्थीया डीसुझा यांची मालमत्ता
दक्षिणेस वा त्या दिशेस : अंतर्गत रस्ता
पूर्वेस वा त्या दिशेस : संतोष चाहू पाटील यांची मालमत्ता
पश्चिमेस वा त्या दिशेस : रामचंद्र पाटील यांची मालमत्ता

ठिकाण : मुंबई सही/-
दिनांक : २४ जुलै, २०२५

**(मार्क डीमेलो)**
**वकील, उच्च न्यायालय**
**१०१, रोझ रेसिडेन्सी,१ ला मजला, दीक्षित रोड(विस्ता.), ऑफ श्रद्धानंद मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०० ०५७. ई-मेल :** adv.mark.dmello@gmail.com

# भारताच्या पोरींनी रचला इतिहास

■ इंग्लड संघाला दुसऱ्यांदा धोबीपछाड

■ ३-२, २-१ ने जिंकल्या मालिका








। लंडन । वृत्तसंस्था ।
भारतीय महिला संघाने इंग्लंडमध्ये इतिहास रचला आहे. त्यांनी पहिल्यांदाच इंग्लंडमध्ये सलग दोन मालिका जिंकण्याचा पराक्रम केला आहे. तिसऱ्या आणि शेवटच्या एकदिवसीय सामन्यात भारतीय महिला संघाने १३ धावांनी इंग्लंडच्या महिला संघाला पराभूत केले आणि मालिका २-१ ने खिशात घातली. यापूर्वी पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत भारतीय संघाने ३-२ असा विजय मिळवला होता.

प्रथम फलंदाजीला आलेल्या भारतीय संघाला अपेक्षित सुरुवात करता आली नाही. प्रतिका रावल २६ धावांवर बाद झाली. त्यानंतर स्मृती मानधना व हर्लीन देओल यांनी डाव सावरला. परंतु, १८व्या षटकात स्मृती ४५ धावांवर बाद झाली. त्यानंतर हर्लीन देखील ४५ धावांवर बाद झाली. त्यानंतर जेमिमा रॉड्रीग्ज ५० धावांवर बाद झाली. दरम्यान, हरमनप्रीतने आपले शतक झळकावत १०२ धावांची खेळी केली. रिचा घोषने ३८ धावांची नाबाद खेळी करताना संघाला ३१८ धावांपर्यंत पोहोचवले. राधा यादव २ धावांवर नाबाद राहिली.

लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचे दोन्ही सलामीवीर एमी जोन्स व टॅमी बियमोंट यांना क्रांती गौडने बाद केले. एमा लॅम्बने ६८ धावांची खेळी केली. सोफी डंक्ली (३४) व एलिस डेव्हिडसन रिचर्ड्स (४४) यांनी इंग्लंडच्या आशा जीवंत ठेवल्या होत्या. दुसऱ्या बाजूने ब्रंट शतकाजवळ पोहोचली होती. परंतु, ३५ व्या षटकात ब्रंटला ९८ माघारी जावे लागले. चार्ली डीन (२१) व लिन्सी स्मिथ (नाबाद १४) यांचा संघर्ष अयशस्वी ठरला आणि इंग्लंडचा संपूर्ण संघ ४९.५ षटकांत ३०५ धावांत तंबूत परतला. यावेळी भारताच्या क्रांती गौडने तब्बल ६ बळी घेतले.

### भारताच्या 'क्रांती'समोर इंग्लंड असहाय्य

२१ वर्षीय क्रांती गौडने शेवटच्या एकदिवसीय सामन्यात एकूण ६ बळी घेत भारतीय संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. क्रांतीच्या इनस्विंग चेंडूंसमोर इंग्लंडच्या महिला खेळाडू पूर्णपणे असहाय्य दिसत होत्या. इंग्लंडमध्ये एका एकदिवसीय सामन्यात ५ किंवा त्याहून अधिक बळी घेणारी क्रांती गौड ही दुसरी भारतीय महिला वेगवान गोलंदाज ठरली आहे. याआधी तिने महिला एकदिवसीय करंडकाच्या अंतिम सामन्यात ४ बळी घेतले आणि सामनावीराचा किताब जिंकला.

### हरमनपीत कौरची शतकी खेळी

या सामन्यात कर्णधार हरमनप्रीत कौरने मोठा पराक्रम केला आहे. तिने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील ७वे शतक झळकावले. हरमनप्रीतने ८२ चेंडूंमध्ये १०२ धावा पूर्ण केल्या आहेत. त्याचबरोबर हरमनप्रीत आता महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये ४ हजार धावांचा टप्पा गाठणारी केवळ तिसरी भारतीय क्रिकेटपटू बनली आहे. तसेच, या सामन्यात हरमनप्रीतला सामनावीर म्हणूनही निवडण्यात आले. मात्र, क्रांती गौडच्या अद्भुत गोलंदाजीकडे नकळत दुर्लक्ष झाल्याने हरमनप्रीतने सामनावीर पुरस्कारही तिच्याशोबत शेअर केला.

## पाकिस्तान बांगलादेशसमोर नतमस्तक



। ढाका । वृत्तसंस्था ।
बांगलादेशने घरच्या मैदानावर सुरू असलेल्या टी-२० मालिकेत पाकिस्तानला नाक घासायला भाग पाडले आहे. शेवटच्या षटकापर्यंत रंगलेल्या सामन्यात बांगलादेशने थरारक विजयाची नोंद करताना मालिकेत २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

या सामन्यात पाकिस्तानच्या तळाच्या फलंदाजांनी संघर्ष दाखवला होता; परंतु, त्यांना अपयश आले. अशरफने अब्बास आफ्रिदीसोबत ९व्या बळीसाठी ४१ धावांची भागीदारी करत आपले पहिल्टेंटी-२० अर्धशतक पूर्ण केले. बांगलादेशने संयम दाखवताना शोरिफुल इस्लाम, मुस्तफिजूर रहमान आणि तन्झिम हसन या वेगवान गोलंदाजांच्या जोरावर पाहुण्या संघावर दबाव आणला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशकडून जाकेर अलीने ५५ आणि महेदी हसनने ३३ धावांची खेळी केली. हे दोन फलंदाज वगळता बांगलादेशच्या परवेझ होसैन इमोन (१३) शिवाय दुसरं कोणालाही दुहेरी आकडा गाठता आला. उर्वरीत ७ फलंदाज एकेरी धावसंख्येवर माघारी परतले. पाकिस्तानच्या सलमान मिर्झा, अहमद दनियाल व अब्बास आफ्रिदी यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या पाकिस्तानचा निम्मा संघ १५ धावांत तंबूत परतला होता. शोरिफूल इस्लाम व तंझीम हसन साकिब यांनी टिच्चून मारा केला. फहिम अशरफने ५१ धावांची खेळी करून पाकिस्तानला विजयाची आस दाखवली होती. त्याला अब्बास आफ्रिदी (१९), खुशदिल शाह (१३) व अहमद दानियाल (१७) यांनी साथ दिली. शेवटच्या षटकात विजयासाठी ९ धावा हव्या असताना अहमदने उत्तुंग फटका मारला; परंतु, सीमारेषेवर त्याचा झेल टिपला गेला अन् पाकिस्तानचा संपूर्ण संघ १२५ धावांवर गडगडला. बांगलादेशच्या शोरिफूलने ३, तर महेदी हसन व तंझिम यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

## स्पर्धेआधीच चीतपट होण्याची नामुष्की



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
भारतातील युवा कुस्तीपटूंवर जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी मॅटवर उतरण्याआधीच चीतपट होण्याची नामुष्की ओढावण्याची शक्यता आहे. ग्रीसमधील अथेन्समध्ये २८ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान १७ वर्षांखालील जागतिक अजिंक्यपद स्पर्धा खेळवण्यात येणार आहे. मात्र, ग्रीस दूतावासाकडून भारतातील युवा कुस्तीपटूंच्या व्हिसा मुलाखतीच्या विनंतीला प्रतिसाद देण्यात आलेला नाही. भारतीय कुस्ती संघटनेकडून १० जुलै रोजी मुलाखतीसाठी अर्ज करण्यात आला होता; परंतु, आता १२ दिवस उलटून गेले तरी कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. भारतीय कुस्ती संघटनेकडून १६ जुलै रोजी परराष्ट्र मंत्रालयाकडे मध्यस्थी करण्याची विनंतीही करण्यात आली. भारतीय कुस्ती संघटनेचे अध्यक्ष संजय सिंह यांनी या प्रकरणाबाबत मत व्यक्त करताना म्हटले की, गृह मंत्रालय व परराष्ट्र मंत्रालय यांना आमच्याकडून मध्यस्थी करण्याची विनंती करण्यात आली आहे, परंतु ग्रीस दूतावासाकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही.

## आंद्रे रसेलचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम



। किंग्स्टन । वृत्तसंस्था ।
आंद्रे रसेलने वेस्ट इंडिजकडून बुधवारी (दि.२३) शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला. यावेळी वेस्ट इंडिज आणि ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी रसेलला 'गार्ड ऑफ ऑनर' दिला. वेस्ट इंडिजचा स्टार अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेल याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम केला आहे. किंग्स्टन येथे बुधवारी झालेली ऑस्ट्रेलियाविरुद्धची दुसरी टी-२० लढत ही त्याच्या कारकीर्दितील शेवटची लढत ठरली. आंद्रे रसेलला दोन्ही संघांच्या खेळाडूंनी 'गार्ड ऑफ ऑनर' दिले आणि टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे मैदानावर स्वागत झाले. मात्र, वेस्ट इंडिज संघाला रसेलला विजयी निरोप देता आला नाही. ऑस्ट्रेलियाने ८ गडी राखून हा सामना जिंकला आणि पाच सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात रसेलचा आक्रमक खेळ पाहायला मिळाला आणि त्याचा एक षटकार साईड स्क्रीनला भोक पाडून गेला. दोनवेळा टी-२० विश्वचषक जिंकणाऱ्या रसेलने ८६ आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यांत १,१२२ धावा व ६१ बळी घेतले आहेत.

## श्रेयसीची 'सुवर्ण' रोलर स्केटिंग

■ उंच भरारी घेत भारताचे नाव केले उज्वल

■ स्पर्धेत पदक जिंकणारी पहिली भारतीय ठरली



। पुणे । प्रतिनिधी ।
पुण्याच्या श्रेयसी जोशी हिने कोरियात सुरू असलेल्या आशियाई रोलर स्केटिंग स्पर्धेत इनलाईन फ्रिस्टाईल-क्लासिक सर्लेलोम प्रकारात सुवर्णपदक जिंकले. या स्पर्धेत सुवर्ण जिंकणारी ती पहिली भारतीय ठरली असून, तिच्या या यशामुळे भारताच्या क्रीडा इतिहासात नवा अध्याय लिहिला गेला आहे.

आशियाई पातळीवर तीव्र स्पर्धा असताना श्रेयसीने अत्यंत आत्मविश्वासाने आणि प्रगल्भतेने आपली कला सादर केली. तिच्या शानदार कामगिरीमुळे संपूर्ण देशात आनंदाचे वातावरण आहे. विशेषतः पुणेकरांसाठी ही गौरवाची बाब आहे. ही स्पर्धा आशियातील सर्वोत्कृष्ट स्केटर्समध्ये घेतली गेली होती आणि अशा स्पर्धेत श्रेयसीने उंच भरारी घेत भारताचे नाव उज्वल केले असहे. तिच्या कठोर परिश्रमांना आणि चिकाटीला मिळालेला हा सन्मान संपूर्ण युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. श्रेयसीने १०हून अधिक राष्ट्रीय जेतेपद जिंकली आहेत आणि तिची बहीण स्वराली ही सुद्धा स्केटर आहे. तिनेही ९ पेक्षा अधिकवेळा राष्ट्रीय जेतेपद नावावर केले आहे. शिवाय या दोघींच्या नावावर आंतरराष्ट्रीय पदकंही आहेत. पुण्याच्या स्वराली व श्रेयसी यांनी तीन वर्षांच्या असल्यापासून स्केटिंग खेळायला सुरुवात केली आणि वयाच्या सहाव्या वर्षी त्यांनी पहिले राष्ट्रीय पदक जिंकले.

## अंशुल कंबोजचे भारताकडून पदार्पण

। मँचेस्टर । वृत्तसंस्था ।
इंग्लंडविरुद्धच्या चौथ्या कसोटी सामन्यात अंशुल कंबोजने भारताकडून पदार्पण केले आहे. सामना सुरू होण्यापूर्वी दीपदास गुप्ताने त्याला पदार्पणाची कॅप दिली. २०२३ मध्ये हरियाणा संघाला विजय हजारे ट्रॉफी जिंकून देण्यात मोठे योगदान दिल्याने अंशुल कंबोज भारतीय क्रिकेटमध्ये चर्चेत आला. त्या स्पर्धेत अंशुलने १० सामने खेळले आणि १७ बळी घेतले. त्याला आयपीएल २०२४ मध्ये मुंबई इंडियन्सकडून ३ सामने खेळण्याची संधी मिळाली होती. अंशुल कंबोज हा भारतीय स्थानिक क्रिकेटमध्ये एकाच डावात सर्व १० बळी घेणारा तिसरा गोलंदाज आहे. त्याने केरळविरुद्धच्या सामन्यात ३०.२ षटके टाकली आणि फक्त ४९ धावा देऊन १० बळी घेतले.

शपागेझा क्रिकेट लीग २०२५ स्पर्धा | ४० वर्षीय नबी अद्यापही क्रिकेटमध्ये सक्रिय

## क्रिकेटच्या मैदानात बाप-लेक भिडले



। काबुल । वृत्तसंस्था ।
क्रिकेटमध्ये आत्तापर्यंत अनेक बाप-लेकांच्या जोड्या पाहायला मिळाल्या आहेत. परंतु, असे फार क्वचितच पाहायला मिळते की पिता आणि पुत्र एकाच सामन्यात आमने-सामने खेळत आहेत. नुकतीच मंगळवारी (दि.२२) अशी घटना घडली आहे. अफगाणिस्तानचा दिग्गज अष्टपैलू खेळाडू मोहम्मद नबी आणि त्याचा मुलगा हसन इसाखिल हे एका सामन्यात खेळले, परंतु एकमेकांच्या विरुद्ध खेळले. त्यामुळे ४० वर्षीय नबी अद्यापही क्रिकेटमध्ये सक्रिय आहे, तर त्याचा १८ वर्षांचा मुलगा हसन इसाखिल हा देखील त्याच्या पावलावर पाऊल टाकत क्रिकेटमध्ये कारकिर्द घडवताना दिसत आहे.

सध्या अफगाणिस्तानमध्ये शपागेझा क्रिकेट लीग २०२५ स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत अमो शार्क्स आणि मिस ऐनाक नाईट्स हे संघ मंगळवारी आमने-सामने होते. अमो शार्क्सकडून हसन खेळत होता, तर नबी मिस ऐनाक नाईट्सकडून खेळत होता. या सामन्यात अमो शार्क्स प्रथम फलंदाजीला आले. संघाने १९.४ षटकात सर्वबाद १६२ धावा केल्या. यावेळी हसन अब्दुल मलिकसोबत सलामीला आला. मलिक २ धावांवरच बाद झाला. त्यानंतर हसनने अर्धशतक करताना इम्रान (२४) आणि शहिदुल्लाह (४५) यांच्यासोबत चांगली भागीदारी केली. हसन अर्धशतकानंतर १२ व्या षटकात (५२) त्रिफळाचीत झाला. त्यानंतर १६३ धावांचा पाठलाग मिस ऐनाक नाईट्सने १७ षटकात ५ बाद १६८ धावा करून पूर्ण केला. त्यांच्याकडून खलील तनिवालने सर्वाधिक ५६ धावांची खेळी केली. तर, वफिउल्लाह ताराखिलने ४९ धावांची खेळी केली. कर्णधार रेहमनुल्ला गुरबाझने २८ धावा केल्या.

### वडिलांच्या पहिल्याच चेंडूवर षटकार

नबी डावाच्या ९व्या षटकात गोलंदाजीला आला होता. हे त्याचे सामन्यातील पहिले षटक होते. त्यावेळी हसनने नबीच्या पहिल्याच चेंडूवर खणखणीत षटकार खेचला. ते पाहून नबीही काहीसा आश्चर्याने पाहात होता. दरम्यान, मुलानेच वडिलांच्या सामन्यातील त्यांच्या पहिल्याच चेंडूवर षटकार मारण्याचा या दुर्मिळ घटनेचा व्हिडिओ सध्या जोरदार व्हायरल होत आहे. हसन हा अफगाणिस्तानच्या १९ वर्षांखालील संघाचाही भाग राहिला आहे. त्याने ४ प्रथम श्रेणी आणि २५ टी-२० सामने खेळले आहेत.

## निवडक

### एबी डिव्हिलियर्स बनला स्पायडरमॅन



**नवी दिल्ली :** वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्सच्या दुसऱ्या हंगामात इंडिया चॅम्पियन्स संघ २२ जुलै रोजी दक्षिण आफ्रिका चॅम्पियन्स संघाशी भिडला. या सामन्यात त्यांना डकवर्थ लुईस नियमानुसार ८८ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. या सामन्यात, दक्षिण आफ्रिका संघाचे नेतृत्व करणाऱ्या ४१ वर्षीय एबी डिव्हिलियर्सने पुन्हा एकदा सीम रेषेवर त्याच्या अद्भुत क्षेत्ररक्षणाने चाहत्यांना जुन्या काळाची आठवण करून दिली. त्याने सरकताना युसूफ पठाणचा झेल पकडला तेव्हा सर्वांनाच आश्चर्य वाटले. या सामन्यात साउथ आफ्रिकेच्या ४१ वर्षीय कर्णधार एबी डिव्हिलियर्सने आपल्या जबरदस्त क्षेत्ररक्षणाने पुन्हा एकदा चाहत्यांच्या मनात जुने दिवस जागवले. विशेषतः त्याने युसूफ पठानचा घेतलेला स्लाइडिंग कॅच सर्वांनाच थक्क करणारा होता. युसूफने इम्रान ताहीरच्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला होता; परंतु, बाउंड्रीजवळ उपस्थित असलेल्या डिव्हिलियर्सने सुरेख स्लाइड करत बॉल झेलला आणि लगेचच सारेल इरवीकडे उडवून अप्रतिम सहकार्य दाखवले. या फील्डिंगमुळे चाहत्यांना त्याचा 'स्पायडरमॅन' अंदाज आठवला. फक्त फील्डिंगच नाही तर डिव्हिलियर्सने बॅटिंगमध्येही तुफानी कामगिरी केली. त्याने अवघ्या ३० चेंडूंमध्ये ३ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६३ धावांची दमदार खेळी साकारली.

### भारतीय संघावर दुखापतींचा कहर

**नवी दिल्ली :** भारतीय संघ सध्या दुखापतींच्या फेऱ्यातून जात आहे. नितीश कुमार रेड्डी, आकाश दीप आणि अर्शदीप सिंग हे गेल्या काही दिवसांपासून दुखापतींमुळे चर्चेत आहेत. त्यातच ३ खेळाडूंवर शस्त्रक्रिया झाली आहे, तर आरसीबीचा कर्णधार रजत पाटीदारही जखमी आहे. एलएसजीचा वेगवान गोलंदाज मयंक यादव दुखापतीमुळे चर्चेत आहे. मयंकने आयपीएल २०२५ मध्ये फक्त २ सामने खेळले आणि पुन्हा दुखापत झाली. त्यामुळे तो बाहेर होता आणि गेल्या महिन्यात न्यूझीलंडमध्ये त्याची शस्त्रक्रिया झाली. त्यामुळे तो ६-८ महिने बाहेर राहणार आहे. आवेश खान आणि मोहसीन खान हे देखील जखमी आहेत. आवेशने आयपीएल २०२५ मध्ये १३ सामने खेळले आणि १३ बळी घेतले. मात्र, गुडघ्याच्या दुखापतीमुळे त्याला बाहेर ठेवण्यात आले. १७ जून रोजी त्याच्यावर शस्त्रक्रियाही झाली. तर, मोहसीनवर गेल्या महिन्यात एसीएल शस्त्रक्रिया करण्यात आली. दुखापतीमुळे मोहसीन संपूर्ण आयपीएलला मुकला होता. आता हे तिघेही २०२५-२६ च्या स्थानिक हंगामाच्या सुरुवातीला खेळू शकणार नाहीत. तसेच, आरसीबीला वर्षानुवर्षे वाट पाहिल्यानंतर ट्रॉफी जिंकणारा रजत पाटीदारही यावेळी दुखापतग्रस्त आहे. तो मध्य प्रदेशकडून दुलीप ट्रॉफी खेळताना दिसणार नाही. त्याला हाताला आणि टाचेला दुखापत झाली आहे. तो आता बरा होत आहे आणि वेळ लागेल. मात्र, तो रणजी ट्रॉफीसाठी परत येईल. रजतने यापूर्वीच भारतीय संघासाठी कसोटी आणि एकदिवसीय सामने खेळले आहेत. इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत पाटीदार भारतीय संघाचा भाग होण्याच्या शर्यतीत होता, परंतु हाताच्या दुखापतीमुळे तो बाहेर पडला.

### कैफची शुभमन गिलवर टीका

**मँचेस्टर :** भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना मँचेस्टरमध्ये सुरू आहे. चौथ्या कसोटीसाठी भारताच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये तीन बदल करण्यात आले. चौथ्या कसोटीतून करुण नायरला वगळल्याने माजी भारतीय क्रिकेटपटूने भारताचा कर्णधार शुभमन गिलवर टीका केली आहे. भारत आणि इंग्लंड संघात सुरू असलेली अँडरसन - तेंडुलकर ट्रॉफी २०२५ ही कसोटी मालिका रोमांचक वळणावर आहे. हा सामना बुधवारपासून मँचेस्टरमधील ओल्ड ट्रॅफर्ड येथे खेळवला जात आहे. या सामन्यासाठी भारतीय संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये तीन मोठे बदल झाले आहेत. अष्टपैलू नितीश कुमार रेड्डी आणि वेगवान गोलंदाज आकाश दीप हे दुखापतीमुळे या सामन्यासाठी उपलब्ध नाहीत. तसेच, या मालिकेत पहिल्या तिन्ही सामन्यात फारशी चांगली कामगिरी करता न आल्याने करुण नायरलाही संघातून वगळण्यात आले आहे. त्याच्या खराब फॉर्ममुळे त्याला पुन्हा आपले स्थान गमवावे लागले आहे. मात्र, करुणला वगळून सुदर्शनला संधी दिल्याने भारताचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद कैफने भारताचा कर्णधार शुभमन गिलवर टीका केली आहे. कैफने सोशल मीडियावर लिहिले की, शुभमन गिकडे आज करुण नायरला पाठिंबा देण्याची संधी होती. तो आता संघातून बाहेर आहे. पण तो आणखी एक संधी मिळवण्यासाठी पात्र होता. मात्र, त्याची निवड न करून गिलने मोठी संधी गमावली. कठीण निर्णय घेत असताना नेतृत्वगुण दाखवून आदर प्राप्त करण्याची ही खरी वेळ होती. पण त्याने ती संधी गमावली, असे कैफ म्हणाला.

### काव्या मारनं नव्या संघाची मालकीण

**नवी दिल्ली :** आयपीएलमधील सनरायझर्स हैदराबादची मालकी असलेल्या कंपनीने आता इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डच्या 'द हंड्रेड' लीगमधील नॉर्दर्न सुपरचार्जर्स संघ तब्बल १००.५ मिलियन पौंडला (सुमारे १,१६१ कोटी) खरेदी केला आहे. हा करार पूर्ण झाल्यानंतर, नॉर्दर्न सुपरचार्जर्स लिमिटेड ही कंपनी पूर्णपणे सन टीव्ही नेटवर्कची उपकंपनी बनेल. या करारामुळे सन टीव्हीने इंग्लंड वेल्स प्रीमियर लीगच्या इकोसिस्टममध्ये अधिकृत एन्ट्री केली आहे. सन टीव्ही क्रिकेट फ्रँचायझींच्या दुनियेत नवा नाही. काव्या मारन यांच्या नेतृत्वाखालील या नेटवर्कने आधीच आयपीएल आणि एसए२० लीगमध्ये आपली ताकद दाखवली आहे. आता इंग्लंडच्या 'द हंड्रेड'सारख्या लोकप्रिय टीमध्येही त्यांनी गुंतवणूक केली आहे. कंपनीने नॅशनल स्टॉक एक्स्चेंजला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आम्ही क्रीडा क्षेत्रात आमची गुंतवणूक वाढवत आहोत आणि 'द हंड्रेड'चा भाग असलेल्या संघात गुंतवणूक करत आहोत. हा संघ आधीपासून नफा कमावत आहे आणि टी-२० क्रिकेटच्या वाढत्या लोकप्रियतेचा फायदा घेण्यासाठी सज्ज आहे. या डीलने अनेकांचे भुवया उंचावल्या आहेत, कारण हा करार क्लबच्या २०२४ आर्थिक वर्षातील १.८९ मिलियन पौड उत्पन्नाच्या ५३ पट किमतीला झाला आहे. पण नफ्यातील संघ, 'द हंड्रेड'ची वाढती लोकप्रियता आणि इंग्लंडमधील बाजारपेठेची संधी पाहता, सन टीव्हीने दीर्घकालीन नफ्यासाठी गुंतवणूक केली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)